मराठे प्रतिष्ठान, मुंबई यांचे मुखपत्र

# हितगुज

अंक १३६ ✿ संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृष्ठ १२०) ✿ डिसेंबर २०२३

Website : www.marathepratishthan.org

(फक्त खाजगी वितरणासाठी)

## संपादकीय

***प्रिय कुलबांधवांना आणि भगिनींना***
***माझा स्नेहपूर्वक नमस्कार.***

या वर्षीचा हा 'हितगुज'चा शेवटचा अंक. नवीन वर्ष जानेवारी २०२४ मध्ये सुरू होईल. आपला 'हितगुज'चा अंक मार्च २०२४ मध्ये निघेल. 'हितगुज' हे त्रैमासिक आहे. सरत्या वर्षाला निरोप आणि नवीन वर्षाचे स्वागत केले जाईल.

मंडळी नवीन वर्षात २०२४ मध्ये आपल्या मराठे कुलबांधवांचे संमेलन कणकवली येथे दोन दिवस ६ जानेवारी आणि ७ जानेवारी, शनिवार-रविवार असे साजरे होत आहे. मराठे परिवारासाठी ही आनंदाची गोष्ट आहे. बडोदा संमेलनानंतर कुलबांधव या निमित्ताने जमतील, एकत्र येतील. भेटी-गाठी होतील. संमेलन कधी होणार याची ओढ अनेक कुलबांधवांना लागलेली असते. ते दूरध्वनीवरून विचारत असतात की, कधी आपले मराठे कपिगोत्री परिवाराचे संमेलन होणार, त्यांचासाठी हे संमेलन होणे खुशखबरीचे ठरेल.

कणकवली येथे होणारे संमेलन यशस्वी होण्यासाठी आपले कार्यकारिणीतील सदस्य, अध्यक्ष आणि कणकवली-कोकणातील कुलबांधव जोराने प्रयत्न करीत आहेत. उपस्थित संमेलन सहभागी कुलबांधवांची-भगिनीची गैरसोय होऊ नये म्हणून जास्तीत जास्त चांगली व्यवस्था कशी देता येईल यासाठी ते प्रयत्नशील आहेत.

संमेलनाच्या निमित्ताने 'स्मृतीगंध' नावाची स्मरणिका प्रकाशित होणार आहे. आपली कुलभगिनी सौ. सीमा मराठे (सा. किरात, संपादिका) वेंगुर्ले यांनी प्रकाशनाचे, संपादनाचे उत्तरदायित्व स्वीकारले आहे. असो.

मंडळी मार्गशीर्ष महिन्यातील पौर्णिमेला दि. २६ डिसेंबरला श्रीदत्तजयंती आहे. श्रीदत्तजन्माचा उत्सव मोठ्या भक्तीभावाने साजरा केला जातो.

ज्यांचा कोणाही मनुष्य गुरुवर विश्वास बसत नसेल व स्वतः चा उद्धार करण्यासाठी तर गुरू पाहिजे असे वाटत असेल त्यांनी श्रीदत्ताला गुरू मानून त्याची भक्ती करावी. श्रीदत्त हा परमात्म्याचा 'गुरु' अवतार होय. परमात्म्याचे इतर अवतार हे इतर अनेक कार्यांच्या संकल्पाने झाले आहेत, तसा श्रीदत्तावर हा गुरुकार्याच्या संकल्पाने झालेला आहे. म्हणून त्याचे नाव घेताना 'श्रीगुरुदेव' प्रथम मग 'दत्त' म्हणतात. श्रीगुरुदेव दत्त.

दैत्यांचा नाश, भक्तजनांचा उद्धार ही कार्ये इतर अवतारांनी केली आहेत. पण 'अज्ञानाचा नाश करणे' हे श्रीदत्तात्रेयांचे प्रमुख प्रयोजन आहे. रामकृष्णादि अवतारांचे कार्य मर्यादित कालाचे होते आणि म्हणून ते कार्य संपताच ते ते अवतार निजधामास गेले पण श्रीदत्तात्रेयांचे कार्य तसे मर्यादित काळाचे नाही. कामक्रोधादि आसुर हे जन्मोजन्मी छळणारे आहेत, आणि सृष्टी अनंतकाळ राहणारी असल्यामुळे अनंत जीवराशींमध्ये अनंत मुमुक्षू उत्पन्न होणारे असतात, तेव्हा त्यांचा अविद्या-अज्ञान अंधकार नाहीसा करून त्यांचा उद्धार करण्याचे कार्य अनंतकाळ चालवायचे यासाठी दत्त अवतार हा 'चिरंजीव' आहे. श्रीदत्तात्रेय आपल्या भक्तांना भोग व मोक्ष दोन्ही देतात.

कणकवली येथे संपन्न होणाऱ्या मराठे प्रतिष्ठानच्या संमेलनाला शुभेच्छा देते आणि नवीन वर्ष सुखाचे, समृद्धीचे, भक्तीचे, चांगल्या सत् प्रवृत्तीचे जावो ही श्रीगुरुदेव दत्तात्रेयांना प्रार्थना करते.

आपली शुभचिंतक
**डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे,** (पृ. १२०),
(दि. ४ डिसेंबर, २०२३)
भ्रमणध्वनी : ९८२०२ ३२०८२/८४३३६ ७४८२७

संपादिका : डॉ. सौ. सुमेधा प्र. मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई - ४०००३१
दूरध्वनी : ८४३३६७४८२७ • इ-मेल : hitguj@marathepratishthan.org
मुद्रक : इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई - ४०००३१

# मराठे परिवाराचे अखिल भारतीय संमेलन

## कणकवली येथे दि. ६ व ७ जानेवारी २०२४

**नमस्कार कुलबांधव आणि भगिनींनो,**

आपल्या 'मराठे परिवारा'च्या १२व्या 'अखिल भारतीय संमेलना'च्या तारखा याअगोदर आपणास कळवल्या आहेत. ६ व ७ जानेवारी २०२४ पूर्ण दोन दिवस आपले कुलसंमेलन कणकवली, जि. सिंधुदुर्ग येथे वाळकेश्वर कार्यालय, कनेडी रोड. येथे होणार आहे. आपण प्रत्येकाने यायचं आहेच शिवाय आपल्या परीचयातील, नात्यातील सर्व मराठे कुटुंबीयांना आपणही या संमेलनाचे निमंत्रण द्या व येण्यासाठी उद्युक्त करा. परिवाराच्या संमेलनासाठी परीवारातील प्रत्येकाने आपणहून सहभागी होऊन संमेलन यशस्वी करायचं आहे.

**मुख्य सूचना. आपण कसे येणार आहात व कितीजण येणार आहात ते आम्हाला अगोदर कळवावे.** जर कोणी ५ तारखेला सायंकाळी येणार असेल तरीही रात्री झोपण्यासाठी हॉलमध्ये जाऊ शकता.

**विशेष सूचना : जे ५ तारखेला येणार आहेत त्यांच्या रहाण्याची व जेवणाची सोय हॉल मध्ये करण्यात आली आहे. त्यांना त्यासाठी फक्त रु २००/- वेगळे द्यावे लागतील. यामध्ये रहाणे व रात्री चे जेवण असणार आहे.**

**हॉलमध्ये रहाण्याची सोय आहे**

सर्व उपस्थित असणाऱ्या परिवारजनांनी हॉलमधेच राहील्यास उपस्थितांशी संभाषण होणे, जुन्या आठवणींना उजाळा मिळणे, नवीन ओळखी होणे या गोष्टी होऊ शकतात. तेव्हा सर्वांनी हॉलमधेच रहावे. ज्यांना अगदी झोपण्यासाठी बेडची आवश्यकता भासते तेच फक्त हॉटेल मध्ये राहू शकतात. हॉटेलचे संपर्क क्रमांक हवे असल्यास आम्हाला संपर्क करावा. तेथे तुम्ही तुमचे बुकिंग करु शकता. पूर्ण संमेलनाचे नोंदणी शुल्क रु १०००/- प्रत्येकी, यामध्ये ६ ता. ला सकाळी नाश्ता चहा, दुपारी जेवण, सायंकाळी चहा व हलका अल्पोपहार व रात्री जेवण. ७ तारखेला सकाळी चहा नाश्ता, दुपारी जेवण व सायंकाळी चहापान झाले की संमेलन समाप्ती.

**एक महत्त्वाची सूचना :** आपल्यापैकी बरेच जणांना संमेलनासाठी यायचं मनात असेल. मात्र संमेलन शुल्क जास्त वाटत असेल त्यांनी कोणत्याही प्रकारचा संकोच न बाळगता संम्मेलनाला यायचं आहे. आपल्याला जेवढे शक्य असेल तेवढेच शुल्क आपण जमा करावे. बाकी आपले प्रतिष्ठान आपलेपणाने करेल. अगदी शक्य नसल्यास काहीही शुल्क न भरता जरी कोणा कुलबांधव भगिनींना उपस्थित रहायचे असेल त्यांनीही उपस्थित रहावे. आपली उपस्थिती अगत्याची आणि महत्त्वाची आहे.

ज्या कोणाला संमेलनामध्ये आपले कलागुण सादर करायचे असतील त्यांनी दि २० डिसेंबर २०२३ पर्यंत आपण काय करू इच्छित आहात ते कळवावे म्हणजे नियोजन करणे सोपे जाईल. आयत्या वेळी संधी देणे शक्य होत नाही.

संमेलनासाठी निवेदन करण्यासाठी कोणी इच्छुक असेल त्यांनी लगेच कळवावे.

**आवाहन :** संमेलनाची आठवण म्हणून स्मरणिका छापत आहोत स्मरणिका आकर्षक होण्याकरता माहितीपूर्ण लेख, भरपुर जाहिराती हव्यातच. यासाठी आपण जाहिरात तसेच शुभेच्छा देण्यासाठी आपणांस आवाहन करीत आहोत.

**जाहिरातीचे दर पुढीलप्रमाणे.**

**स्मरणिका जाहिरात दर:** Back page २००००; २ & ३ cover page १५०००; Colour Page : full १००००; Half ५०००; Quarter २०००; B/w Page : Full ५०००; Half ३०००; Quarter १५००

**स्मरणिका आकार १८सेमी /२४ सेमी**

फक्त स्वतःच्या नावाने शुभेच्छा द्यायच्या असतील त्यांनी कमीतकमी रु ५००/- जास्तीत जास्त कितीही द्यावेत. जाहिराती १० डिसेंबर २०२३ पर्यंत पाठवाव्यात

'मराठे प्रतिष्ठान'चे बँक डिटेल्स पुढीलप्रमाणे : चेक या खात्यात भरा/ पैसे NEFT, अथवा Bank Transfer करू शकता: Marathe Pratishthan, IDBI Bank, Dadar (W); IFSC IBKL0000501; Savings A/C no. 0501104000043519

पैसे पाठविल्यानंतर कृपया अनंत मराठे, कोषाध्यक्ष, मराठे प्रतिष्ठान यांना मोबाईल क्र. ९८३३९४४९१३ वर कळवावे. व खाली दिलेल्या कोणत्याही एका क्रमांकावर जाहिरात पाठवावी.

संमेलन स्थळी ज्यांना जाहिरात बॅनर लावायचे असतील त्यांचे बॅनरही लावले जातील. शुल्क रु. ५०००/- जे इच्छुक आहेत त्यांनी संपर्क साधावा. संमेलन स्थळी स्टॉल लावायचा असेल तर तीही सोय आहे. जे इच्छुक आहेत त्यांनी लगेच संपर्क साधावा.

सर्व सविस्तर लिहीले आहे. तरीही कोणाला काही विचारायचे असेल तर आम्हाला संपर्क करा. ज्यांना सहभागी होता येणार नाही त्यांनी संमेलना करता भरघोस देणगी द्यावी व आपले कुलसंमेलन यशस्वी करण्यात हातभार लावावा.

**संपर्क करण्यासाठी:** श्री विजय मराठे, अध्यक्ष. पुणे ९४२३०११९४९.; श्री शैलेंद्र मराठे, कार्योपाध्यक्ष दहिसर मुंबई ९८२०४०४५५४.; हेमंत मराठे कार्यवाह, नालासोपारा मुंबई. ९८२२८४७१२०

# उद्योगांचं सामाजिक दायित्व

◆ डॉ. गिरीश जाखोटिया (पृ. १२९) भ्रमणध्वनी : ९८२००६२११६

**असा कायदा व सक्ती करण्याच्या खूप पूर्वी भारतातील काही उद्योजकीय समूहांनी सामाजिक दायित्वावर बरंच काम केलं आहे. 'टाटा समूह' याबाबतीत खूपच अग्रेसर राहिला आहे. ज्या समाजामुळे आपला उद्योग भरभराटीस येतो त्या समाजाला आपण काही देणं लागतो ही उदात्त व उपयोगी संकल्पना हा 'सीएसआर'चा मूलभूत गाभा आहे.**



हल्ली कॉर्पोरेटजगतात उद्योगांचं सामाजिक दायित्व हे 'सीएसआर' म्हणजे 'कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी' या नावानं प्रचलित आहे. याबाबतीत कंपनी-कायद्यात तरतुदीही करण्यात आल्या आहेत. विशिष्ट आकाराच्या कंपन्यांनी आपल्या सरासरी निव्वळ नफ्याच्या दोन टक्के इतका खर्च दर वर्षी 'सीएसआर'वर करणं सक्तीचं केलं गेलं आहे. त्याबरोबरच संचालक-मंडळाच्या देखरेखीखाली काम करणारी 'सीएसआर समिती'सुद्धा स्थापन व्हायला हवी.

आंतरराष्ट्रीय संकेतानुसार, या सामाजिक दायित्वाचे चार प्रकार पडू शकतात, १. नैसर्गिक वातावरणाचं संतुलन राखणं, उदाहरणार्थ – सर्व प्रकारचं प्रदूषण टाळणं. २. सचोटीपूर्ण व न्यायपूर्वक उद्योग करणं, उदाहरणार्थ – कर्मचाऱ्यांना योग्य वेतन देणं. ३. समाजासाठी दानशूरता, उदाहरणार्थ – तळागाळातील लोकांसाठी उपयोगी प्रकल्प राबवणं आणि ४. अर्थशास्त्रीय बांधिलकी, उदाहरणार्थ – साधनसामग्रीचा सर्वोत्तम उपयोग करणं. प्रत्येक कंपनी आपापल्या भौगोलिक क्षेत्रातील गरजांनुसार या चारही वैशिष्ट्यांचं सुयोग्य मिश्रण ठरवू शकते.

उद्योगाच्या सामाजिक दायित्वाची दहा साधारण उद्दिष्ट अशी सांगता येतील. १. भूमिपुत्रांना उत्कर्षाची संधी व साधनं उपलब्ध करून देणं, २. निसर्गाची व राष्ट्रऋणाची भरपाई करणं, ३. सामाजिक जाणीव वृद्धिंगत करणं व त्यांचा व्यक्तिमत्त्वविकास साधणं, ५. स्थानिक अर्थव्यवस्थेत सुधारणा, ६. पुरवठादाराचं व वितरकांचं सामाजिक भान वाढवणं, ७. कंपनीची प्रतिमा सुधारणं, ८. सरकारी यंत्रणेवर नैतिक प्रभाव टाकणं, ९. उत्तम आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त करणं आणि १०. उद्योजकीय आसक्ती व विरक्ती यांमध्ये संतुलन साधणं. ही उद्दिष्टं गाठण्यासाठी 'सीएसआर' समितीची कार्यकारी रचना ही काळजीपूर्वक करायला हवी.

**या रचनेचे तीन भाग असू शकतात, वरिष्ठ भाग हा सल्लागार मंडळाचा असेल. यांत काही अनुभवी सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश करावा. दुसरा भाग हा व्यवस्थापकीय मंडळाचा असावा, ज्यात कंपनीतील वरिष्ठ व कनिष्ठ कर्मचारी कार्यरत असतील.अर्थात् नेहमीच्या नोकरीव्यतिरिक्त हे अधिकचं काम असल्यान 'सामाजिक कार्या'ची आवड ही असायलाच हवी. 'सीएसआर'च्या**

**कामाची व्याप्ती खूप वाढल्यास काही पूर्ण वेळ कर्मचारी नेमावेत. तिसरा भाग हा 'सहकारी मंडळा'चा असेल. यात सर्व सुयोग्य अशा सेवाभावी संस्था (एनजीओ) असतील.**

'सीएसआर'ची अंमलबजावणी व्हावी यासाठी काही पथ्यं जरूर पाळायला हवीत. सामाजिक दायित्व निभावताना जातीय, प्रांतीय, भाषिक भेदाभेद व्हायला नकोत. एखाद्या उद्योगपतीला स्वजातीय लोकांसाठी काही विशेष कार्य करायचं असल्यास त्याची स्वतंत्र तरतूद करावी. 'सीएसआर'च्या खर्चाचा काटेकोर हिशेब ठेवायला हवा. ज्या 'एनजीओ'बरोबर काम करायचं आहे तिची संपूर्ण माहिती घ्यायला हवी. शक्यतो जिथं आपला उद्योग चालतो तिथल्या भूमिपुत्रांना योग्य ते प्राधान्य द्यायला हवं. आपण जे प्रकल्प राबवणार आहोत त्याची माहिती तळागाळातील गरजूंपर्यंत नीटपणे पोहोचायला हवी. 'सीएसआर'च्या समितीमधील सदस्य हे दर तीन वर्षांनी बदलायला हवेत. यामुळे हितसंबंध तयार होत नाहीत व नवनव्या संकल्पनांची शक्यता वाढते. छोटे प्रासंगिक प्रकल्प व मोठे दूरगामी प्रकल्प यांचं विस्तृत नियोजन करायला हवं. दोहींची सरमिसळ होता कामा नये. सामाजिक दायित्वाचा देखावा टाळायला हवा. अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे, दर दोन-तीन वर्षांनी 'सीएसआर'च्या एकूण कामाचं ऑडिट करून घ्यायला हवं. सामाजिक दायित्वाचे उद्देश, धोरणात्मक चौकट, प्रक्रिया व वित्तीय बाबींचं मूल्यमापन या ऑडिटद्वारे अपेक्षित आहे.

नैसर्गिक वातावरणातील छोट्या सुधारणांचे प्रकल्प प्रत्येक उद्योजक स्वत:च्या वसाहतीतही करू शकतो. झाडांची लागवड, कचऱ्याचं व्यवस्थापन, सांडपाण्याचं व्यवस्थापन इत्यादी अनेक स्थानिक प्रकल्प लोकांच्या गरजेचे असतात. आपल्या कंपनीतील महिला अधिकारी या 'सीएसआर'च्या माध्यमातून गरीब वस्त्यांमधील महिलांचं व आपल्याच कनिष्ठ कामगारांच्या कुटुंबीयांचं विविध प्रकारचं प्रबोधन व प्रशिक्षण करू शकतात, याला आपण 'एचआरडी थ्रू एचआरडी' म्हणजे 'ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट थ्रू होम रिसोर्स डेव्हलपमेंट' असं म्हणू शकतो. आपले पुरवठादार व वितरक हे बालकामगारांची पिळवणूक करत असतील तर त्यांच्याशी असलेले उद्योजकीय व्यवहार आपण थांबवू शकतो किंवा त्यांच्या वर्तणुकीत बदल घडवून आणू शकतो. स्थानिक रहिवाशांसाठी प्राथमिक शिक्षण, पाणी, औषधोपचार, दळणवळण, ऊर्जा, घरांची व रस्त्यांची डागडुजी इत्यादी दूरगामी प्रकल्प एकत्र येऊन राबवू शकतात. भारतात तब्बल ८० कोटी लोक कनिष्ठ मध्यमवर्गीय व गरीब आहेत. यांच्यासाठी सामाजिक दायित्व जेवढं निभावू तेवढं थोडंच.

'सीएसआर'ची संघटित कॉर्पोरेट संकल्पना ही मुळात पाश्चिमात्य देशांनी विकसित केलेली आहे. भारतात पारंपरिकरीत्या उद्योजकांनी सामाजिक दायित्वाकडे एक धार्मिक कार्य म्हणूनच बहुतांश पाहिलं आहे. त्यामुळे त्याचं इथलं स्वरूप हे कौटुंबिक राहिलं आहे. सामाजिक दायित्वाला इथं 'जातीय' स्वरूप मिळालेलं आहे. म्हणजे बरेच उद्योजक हे आपापल्या जातीच्या विकासासाठी स्वत:च्या 'फॅमिली ट्रस्ट'तर्फे निधी उपलब्ध करून देतात. सामाजिक दायित्व निभावण्याचं स्वरूप हे खरं तर राष्ट्रीय असायला हवं. याबाबतीत टाटा समूहाचं कार्य हे अत्यंत प्रशंसनीय आहे. भारतात बराच काळ प्रार्थनास्थळांच्या बांधणीला व तत्सम धार्मिक दानधर्माला भारतीय उद्योजक प्राधान्य देत आले आहेत. हल्ली मात्र हे उद्योजक सामाजिक सुधारणा गांभिर्यानं घेऊ लागले आहेत. पूर्वी दानशूरपणा करण्यात समोरच्याला उपकृत करण्याची भावना असायची. आता मात्र 'सीएसआर' हे सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य म्हणून केलं जातं.

'सीएसआर'चा पद्धतशीरपणे दुरुपयोगही बऱ्याच देशांमध्ये केला जातो. काही उद्योगपती व त्यांच्या कंपन्या आदिवासी समाजातील तरुणांना 'सीएसआर'च्या नावाखाली वनौषधी संशोधन व अन्य ग्रामीण संशोधनास जुंपून त्यांनी केलेल्या यशस्वी व महत्त्वाच्या संशोधनाची पेटंट्स स्वत:च्या नावे करवून घेतात. अन्य काही कंपन्या आपलं दूषित सांडपाणी व अन्य घातक रसायनं स्थानिक नद्यांमध्ये रिचवण्याकरता 'सीएसआर'चा वापर भूमिपुत्रांना भुलवण्यासाठी करतात. अजस्र आकाराच्या काही भ्रष्ट बहुराष्ट्रीय कंपन्या गरीब व अविकसित देशांमध्ये आपला कचरा टाकण्यासाठी तिथल्या भ्रष्ट स्थानिक सरकारांना चुचकारून 'सीएसआर'च्या माध्यमातून आपल्या छबी चकचकीत ठेवण्याचा प्रयत्न करतात. अनेक उद्योगपती आपापल्या भौगोलिक क्षेत्रातील पुढाऱ्यांचे सामाजिक प्रकल्प स्वत:च्या 'सीएसआर' बजेटमधून पूर्ण करून देतात व मग अनेक सरकारी फायदे मिळवतात. हा म्हणजे 'आवळा देऊन कोहळा काढण्याचा'च एक प्रकार असतो.

मुळात उद्योजकांचं सामाजिक दायित्व ही एक अत्यंत उदात्त संकल्पना असायला हवी. समाजाकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरित्या उद्योजक जे घेतात त्याची अंशमात्र उतराई करणं म्हणजे 'सीएसआर' होय. ही एक सार्वजनिक उद्योजकीय संस्कृती बनली तर ती एक ऐच्छिक कर्तव्यपूर्ती ठरेल व अनेकांचं त्यामुळे भलं होत राहील.

***(लेखक हे व्यवस्थापकीय, उद्योजकीय व वित्तीय सल्लागार असून, देशात व परदेशांत त्यांनी विविध विषयांवर दोन हजारांहून अधिक व्याख्याने दिलेली आहेत.)***

❖

# जागतिक वारसा ठरतो कसा?

◆सौरभ मराठे (पृ. ३१६) भ्रमणध्वनी : ९८६०५६१११३

**‘शांतिनिकेतन’ आणि ‘होयसळ मंदिर समूह’ यांना नुकताच जागतिक वारसा स्थळांचा दर्जा मिळाला. जागतिक वारसा स्थळे म्हणजे नक्की काय, ती कोण ठरवते, त्यांचे निकष काय असतात याविषयी...**

पश्चिम बंगालमधील ‘शांतिनिकेतन’ आणि कर्नाटक राज्यातील ‘होयसळ मंदिर समूहा’ला नुकताच जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यात आला. सौदी अरेबियाची राजधानी रियाधमध्ये नुकत्याच पार पडलेल्या ४५व्या जागतिक वारसा समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक संघटना, अर्थात ‘युनेस्को’ ही संस्था सांस्कृतिक किंवा नैसर्गिक वारशासाठी उत्कृष्ट वैश्विक मूल्य असलेल्या स्थळांना जागतिक वारसा म्हणून जाहीर करते. भारतातील जवळपास चाळीसाहून अधिक ठिकाणे या यादीत आहेत. ही जागतिक वारसा स्थळे कशी ठरवली जातात? कोण ठरवते? त्याचे निकष काय असतात हे जाणून घेऊ.

आपल्या पूर्वजांकडून मिळालेल्या, आपले जीवन समृद्ध करणाऱ्या गोष्टी; ज्या आपण जपतो, सांभाळतो आणि पुढील पिढीला हस्तांतरित करतो, त्या वारसा असतात. हा वारसा मूर्त आणि अमूर्त स्वरूपाचा असतो. तो सांस्कृतिक आणि नैसर्गिक प्रकारांतही बघता येतो. जीवनात अशा प्रकारच्या वारशाचे महत्त्व असाधारण आहे.

वारसा वतनासंबंधी गांभीर्याने विचार करण्याची सुरुवात सन १९५४ मध्ये झाल्याचे दिसते. इजिप्तमधील नाईल नदीवर सरकारने आस्वान येथे धरण बांधण्याचा निर्णय घेतला. धरणामुळे प्रचंड



मोठा जलाशय निर्माण होणार होता. त्याचा परिणाम 'अबू सिंबेल' येथील मंदिरावर होऊन, ते पाण्याखाली जाणार होते. एका मोठ्या आणि महत्त्वाच्या वारसा स्थळाचा ऱ्हास होणार होता तो होऊ नये, म्हणून आंतरराष्ट्रीय बचाव मोहीम हाती घेण्यात आली. एक एक करीत ते मंदिर वेगळे करण्यात आले आणि पाण्याचा धोका नसलेल्या एका उंच ठिकाणी त्याची पुनर्बांधणी करण्यात आली. या घटनेने जगभरात वारशाविषयी जागरूकता निर्माण होण्यास सुरुवात झाली.

पुढे १७७२ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या सर्वसाधारण परिषदेने राष्ट्रीय स्तरावर सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाच्या संरक्षणासंबंधीची शिफारस स्वीकारली. त्या वेळच्या सर्व सदस्यांनी एकत्र येऊन, त्याच्या दस्तावेजावर स्वाक्षऱ्या केल्या. सांस्कृतिक आणि नैसर्गिक वारशाचा क्षय केवळ पारंपरिक कारणांमुळे नाही, तर बदलत्या सामाजिक, आर्थिक, राजकीय परिस्थितीमुळे होत आहे हे लक्षात घेऊन, त्याचे संवर्धन करणे गरजेचे असल्याचे सर्वांनी मान्य केले. राष्ट्रीय स्तरावर वारशाचे संवर्धन संरक्षण अनेक वेळा अपूर्ण राहते, असे दिसून आले. संवर्धनासाठी लागणारा पैसा, आवश्यक असलेले शास्त्रीय ज्ञान व तंत्रज्ञान अनेक वेळा अपुरे पडते. आंतरराष्ट्रीय स्तरावर कायमस्वरूपी आणि आधुनिक वैज्ञानिक पद्धतींचा वापर करून वारशाच्या संरक्षणाची प्रभावी व्यवस्था निर्माण करण्याचे या अधिवेशनात त्यामुळेच ठरले आणि त्यानुसार पुढे कार्यही चालू झाले.

जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी 'युनेस्को'ने प्रक्रिया ठरवून दिली आहे. त्याचे काही निकषही आहेत. एखादे स्थान जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी ते स्थान ज्या देशात आहे, त्या देशाने त्याचे नामांकन करणे गरजेचे असते. ज्या देशांनी जागतिक वारसा अधिवेशनास मान्यता देऊन स्वाक्षऱ्या केल्या आहेत, तेच देश हे नामांकन भरू शकतात. नामांकन झाल्यावर ते स्थान तात्पुरत्या यादीत घेतले जाते. हे झाल्यानंतर त्या देशाने नामांकनाशी निगडित सर्व दस्तावेज सादर करणे गरजेचे असते. पुढे त्या जागेचे मूल्यांकन केले जाते. 'युनोस्को'ने निर्देशित केलेल्या दोन सल्लागार संस्था (इंटरनॅशनल कौन्सिल ऑन मॉन्युमेंट्स अँड साइट्स' आणि 'इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर) त्याचे स्वतंत्रपणे मूल्यांकन करून जागतिक वारसा समितीला अहवाल सादर करतात. त्याचबरोबर एका आंतरसरकारी संस्थेचा सल्लाही घेतला जातो.

नामांकन आणि मूल्यांकन झालेल्या स्थळाबाबत निर्णय घेणे, हे आंतरसरकारी जागतिक वारसा समितीवर अवलंबून असते. वर्षातून एकदा या समितीची बैठक होते आणि कुठली स्थळे समाविष्ट करावीत याविषयी निर्णय घेतला जातो. जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यासाठी, त्या स्थळाने उत्कृष्ट वैश्विक मूल्याच्या दहापैकी किमान एक निवड निकष पूर्ण केला पाहिजे.

**दहा निकष कोणते ?**

१. मानवी सर्जनशीलतेचा उत्कृष्ट नमुना असणे.
२. मानवी मूल्यांची महत्त्वपूर्ण अदलाबदल दिसणे किंवा जगाच्या सांस्कृतिक क्षेत्रातील (वास्तुरचना किंवा तंत्रज्ञान, कला, शहर नियोजन किंवा भूदृश्य) घडामोडी दाखविणारे स्थान असणे.
३. सांस्कृतिक परंपरेची किंवा जिवंत असलेल्या किंवा लुप्त झालेल्या संस्कृतीची अद्वितीय किंवा अपवादात्मक साक्ष देणारे स्थान असणे.
४. मानवी इतिहासासातील एखादा महत्त्वाचा टप्पा दर्शविणाऱ्या इमारती, वास्तुशास्त्रीय किंवा तांत्रिकदृष्ट्या महत्त्वाचे स्थान किंवा भूदृश्य प्रकाराचे उत्कृष्ट उदाहरण असणे.
५. पारंपरिक वसाहती, जमिनीचा वापर किंवा समुद्राच्या वापराचे उत्कृष्ट उदाहरण असणे.
६. एखाद्या घटनेशी किंवा जिवंत परंपरांशी, कल्पनांशी उत्कृष्ट वैश्विक महत्त्व असलेल्या कलात्मक आणि साहित्यिक कृतींशी थेट किंवा मूर्तस्वरूपात त्या जागेचा संबंध असणे.
७. एखाद्या नैसर्गिक घटनेशी संबंधित किंवा विलक्षण नैसर्गिक सौंदर्य असलेले क्षेत्र असणे.
८. पृथ्वीच्या इतिहासाच्या प्रमुख टप्प्यांचे प्रतिनिधित्व करणारे उत्कृष्ट उदाहरण असणे; ज्यात उत्क्रांती, त्याच्याशी निगडित एखादी नोंद, भूस्वरूपाच्या विकासातील महत्त्वपूर्ण भूवैज्ञानिक प्रक्रिया किंवा किंवा महत्त्वपूर्ण असे भौगोलिक किंवा भौतिक वैशिष्ट्य असलेले स्थान असणे.
९. गोडे पाणी, किनारी आणि सागरी परिसंस्था, वनस्पती आणि प्राणी यांच्या समुदायांच्या उत्क्रांती व विकासातील महत्त्वपूर्ण पर्यावरणीय; तसेच जैविक प्रक्रियांचे प्रतिनिधित्व करणारे उत्कृष्ट उदाहरण दिसणे.
१०. विज्ञान किंवा संवर्धनाच्या दृष्टिकोनातून उत्कृष्ट सार्वत्रिक मूल्याच्या आणि धोक्यात आलेल्या प्रजातीसह जैविक विविधतेच्या संवर्धनासाठी सर्वांत महत्त्वाचे आणि लक्षणीय नैसर्गिक अधिवास जिथे आहे, अशी स्थाने.

**भारतातील नवी स्थाने**

जागतिक वारसा स्थळांत नुकताच समावेश झालेले

‘शांतिनिकेतन’ आणि ‘होयसळ मंदिर समूह’ याविषयी पाहू.

‘शांतिनिकेतन’ची स्थापना रवींद्रनाथ टागोर यांनी १९०१ मध्ये केली. निकष क्रमांक चार आणि सहाची पूर्तता होत असल्याने, तसेच उत्कृष्ट वैश्विक मूल्य सिद्ध झाल्याने, या जागेला जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आले. त्याचबरोबर होयसळ मंदिरशैलीतील प्रातिनिधिक स्वरूपाची मंदिरे म्हणून तीन मंदिरांनाही जागतिक वारसा स्थळाचे नामांकन मिळाले. बाराव्या आणि तेराव्या शतकात निर्माण झालेली ही तीन मंदिरे आहेत, बेलूर येथील चेन्नकेशव मंदिर, हळेबीड येथील होयसळेश्वर मंदिर आणि सोमनाथपूर येथील केशव मंदिर. होयसळ शैलीबरोबरच मानवी सर्जनशीलतेचा उत्कृष्ट नमुना म्हणून या तीन मंदिरांकडे बघता येईल. या निकषाबरोबर, म्हणजेच निकष क्रमांक एकबरोबर, क्रमांक दोन आणि चारचा आधार घेत या स्थळांचे नामांकन झाल्याचे दिसते.

आज भारतातील अनेक स्थळे जागतिक वारसा म्हणून बघता येऊ शकतात. औपचारिक घोषणा झाली नसली, नामांकन नसले किंवा ‘युनेस्को’च्या यादीत नसली, तरी हा वारसा महत्त्वाचाच आहे. त्यांचा सांभाळ करणे, जतन संवर्धन करणे आपल्याच हाती आहे.

*(लेखक भारतीय विद्या विषयाचे अभ्यासक असून, वास्तुविशारद आहेत.)* ***म.टा. रविवार, १ ऑक्टोबर २०२३***

❖

---

# मित्रत्वाचं नातं

**प्रिय बाबा यांस,**

तुम्ही माझे सासरे आहात, असं मला कधीच वाटू दिलं नाहीत. तुम्ही मला मुलासारखं नाही तर तुमच्या एखाद्या मित्रासारखं वागवलंत. आपण कुठल्याही विषयावर कधीही बोलू शकत होतो. तुम्हाला तीन मुली होत्या. मुलगा नाही याची तुम्हाला कधीच खंत वाटली नाही. उलट तुम्हाला त्या तिघींचाही अभिमान होता. दरवर्षी एकदा काहीही करून शेगांवला महाराजांच्या पाया पडायला जायचा शिरस्ता तुम्ही शेवटपर्यंत पाळलात. कितीही संकटं आली तरी गजानन महाराज आपल्याला तारून नेतील हा तुमचा दृढविश्वास होता.

तुम्ही स्टेट बँकेत मॅनेजर पदावर असल्यामुळे तुमची वारंवार बदली व्हायची. डहाणूला असताना तर तुम्ही डोंबिवली ते डहाणू आणि परत डोंबिवली असा प्रवास दररोज करायचात. तुमच्या धाकट्या भावाच्या बायकोला कमी वयात कर्करोगामुळे देवाज्ञा झाली. तेव्हा तुम्ही तुमचा भाऊ आणि त्याच्या तीन मुलांच्या पाठीशी उभे राहून त्यांना त्यांच्या पायावर उभं केलंत. या सर्व प्रवासात तुमची बायको म्हणजेच आमच्या सासूबाई अत्यंत ठामपणे तुमच्या पाठीशी उभ्या होत्या. तुम्हाला फिरायची आवड होती. तुम्ही संपूर्ण जग आणि मायदेश फिरून पालथा घातलात. नवनवीन जागा शोधून तिकडे जायला सतत उत्सुक असायचात. मी एकदा गोव्याला क्रूझवर जायची इच्छा व्यक्त केली. तेव्हा तुम्ही लगेच तयार झालात. दुर्दैवानं, तुमची ती इच्छा मी पूर्ण करू शकलो नाही.

तुम्ही निवृत्त झाल्यावर ज्येष्ठ नागरिक संघाचं काम पाहू लागलात. तुम्ही झपाटल्यासारखा संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी पुढील आयुष्य खर्ची केलंत. त्याबद्दल तुम्हाला अनेक पुरस्कारसुद्धा मिळाले. तुमचा जनसंग्रह तर अफाट होता. कुठेही गेलात तरी कुणी ना कुणी तुम्हाला हमखास ओळखीचं भेटायचं. तुम्हाला जुन्या हिंदी सिनेमांची आणि जुन्या गाण्यांची प्रचंड आवड. टीव्हीवर एखादं कृष्णधवल चित्रपटातील गाणं लागलं की, लगेच ‘अरे, हा सिनेमा सात-आठ वेळा पाहिला आहे आणि याच्यात अमुक नायक व तमुक नायिका होती.

काही वर्षांपूर्वी आम्ही तुमचा ८० वा वाढदिवस एका रिसॉर्टमध्ये साजरा केला, त्यावेळी तुम्ही चक्क तिथल्या तरणतलावात सूर मारून पोहलात आणि आम्हाला सर्वांना चकित करून सोडलंत. शेवटी तुम्हाला कर्करोगानं गाठलंच आणि त्याचं निदान होईपर्यंत तो खूपच पसरला होता. डॉक्टरांनी तेव्हाच सांगितलं होतं की, यांच्याकडे आता खूप कमी वेळ आहे. नेमकं त्याच वेळेला माझ्या मुलाचं अजिंक्यचं लग्न अगदी जवळ म्हणजे एका महिन्यावर आलं होतं, त्यामुळे आम्हाला प्रचंड मानसिक त्रास होत होता, पण तुम्ही अगदी खात्रीपूर्वक सांगितलंत, ‘मी अजिंक्यचं लग्न पाहणार’ आणि झालंही तसंच. अजिंक्यचं लग्न झाल्यावर जेमतेम एका महिन्यात तुम्ही आम्हाला सोडून गेलात. तुमच्या शेवटच्या दिवसांत तुम्ही आम्हाला तुमची सेवा करायची संधी दिलीत, हे आमचं भाग्यच!

तुमचा जावई,

**सदानंद मराठे**, सायन

*(सोम. दि. २५ सप्टें. २०२३ म.टा.)*

# स्वरगंगेचे किमयागार

♦ पं. उल्हास कशाळकर

**पं. राम मराठे यांची जन्मशताब्दी सुरू होत आहे. पं. राम मराठे यांची मैफल म्हणजे सुराची वाहती गंगा असे. रसिकांना तृप्त करणाऱ्या अशा मैफलीचे आणि त्यासोबतीने रामभाऊंच्या व्यक्तिमत्त्वाचे शब्दचित्र त्यांच्या पट्टशिष्याने रेखाटले आहे...**

**त्या** काळातील बुजुर्ग कलाकारांनी, त्यांच्या पिढीतील निर्विवाद श्रेष्ठ कलाकाराचा बहुमान ज्यांना दिला, ज्यांच्या मैफलीचे नुसते वर्णन ऐकूनही त्यांच्या संगीत कलेबद्दल आदर वाटावा असे देवगंधर्व पं. भास्करबुवा बखले यांच्याच परंपरेतील दमदार, जोशपूर्ण, आक्रमक गायकी सादर करणारे गायक म्हणजे माझे गुरुवर्य संगीतभूषण पं. राम मराठे. भास्करबुवांचे ध्वनिमुद्रण उपलब्ध नसल्यामुळे, त्यांना प्रत्यक्ष ऐकलेल्या कलाकारांच्या, त्यांच्या शिष्यांच्या आठवणीवरच समाधान मानावे लागते. एक मात्र खरे, की पं. रामभाऊंचे गाणे ऐकून या सर्व बुजुर्ग कलाकार आणि भास्करबुवांच्या चाहते मंडळींनी 'रामभाऊ म्हणजे, भास्करबुवांची आठवण करून देणारे गवई' असे कौतुक केले आहे.



पं. रामभाऊंचा संगीतातील संचार बहुमुखी. घरंदाज ख्यालगायक, बालपणी चित्रपटातील नट, चतुरस्र गायक, संगीत रंगभूमीवरील यशस्वी गायक नट, उत्कृष्ट साथीचे आणि सोलोवादन करणारे डावखुरे तबलावादक, अनेक गायकांच्या वैशिष्ट्यांसह त्यांची हुबेहूब गायकी आणि लकब दाखवणारे अवलिया कलाकार, संगीत नाटकांचे संगीत दिग्दर्शक, याशिवाय उमेदीच्या काळात मराठी भावगीते व चित्रपट संगीतही रामभाऊ गायले आहेत. अशी त्यांची ५५ वर्षांची कारकीर्द आहे. त्यांनी ३०-३५ च्या आसपास उत्तम बंदिशी केल्या आहेत, हे फार थोड्या लोकांना माहिती असावे. उदाहरणार्थ, अडाणा रागातील 'आये मोरे दरबार' आणि नटकेदार रागातील 'पिया घर आये' या दोन उत्कृष्ट बंदिशींवरून ते उत्तम वाग्येयकार असल्याचा प्रत्यय येतो. स्वत:ची साममुद्रा ठेवायला त्यांना संकोच वाटला असावा. त्या बंदिशींमध्ये अनेक बुजुर्ग गुरू, गायकांची नावे समाविष्ट केलेली दिसतात.

रामभाऊंसारखे विद्वान गायक आणि मैफल यशस्वी करण्याचे तंत्र जाणणारे उत्कृष्ट 'परफॉर्मर' गुरू म्हणून लाभले, हे माझे भाग्यच! आमचे वडील भाऊसाहेब कशाळकर यांनी आम्हा सर्व भावंडांना गायन शिकविले आणि आवड निर्माण केली. माझे ज्येष्ठ बंधू अरुणदादा रामभाऊंकडे पाच-सहा वर्षे गुरुकुल पद्धतीने शिकत होते. भाऊसाहेबांनी माझ्यासाठी रामभाऊंकडे शब्द टाकला आणि त्या दिवसापासून माझी तालीम सुरू झाली. रामभाऊंची विद्यार्थ्यांना मुक्तहस्ते विद्या देण्याची कला इतकी कळकळ असे, की कित्येकदा मी पोहोचायच्या आधीच आन्हीक, पूजापाठ इत्यादी आटोपून, तंबोरे जुळवून ते तयारच असायचे. कधीकधी माझ्या जोडीला प्रदीप नाटेकर, सुरेश डेगवेकर, शशिकांत ओक, भरत परचुरे, धनंजय जोशी, निवृत्ती चौधरी इत्यादी शिष्य मंडळी असायची. रामभाऊ आणि वहिनींनी संजू, मुकुंदा इतकेच (रामभाऊंचे दोन्ही सुपुत्र), किंबहुना काकणभर अधिक प्रेम आम्हा सर्व शिष्यांवर केले. त्यात माझ्यावर थोडे अधिक.

पं. रामभाऊंची मैफल हा एक बहारदार अनुभव असे. घरंदाज गायकीचे संस्कार, स्वत:चा विचार आणि रसिकांना भरभरून देण्याची इच्छा यामुळे त्यांच्या बैठकी दीर्घ काळ लक्षात राहत, रसिकांवर गारुड करीत असत. त्या काळातील अनेक गायक-गायिका, त्यांचे गुरुबंधू-भगिनी, वादक (उदा. माणिक वर्मा, मनोरमा वागळे, सी. आर. व्यास, जितेंद्र अभिषेकी, शंकरराव अभ्यंकर, वसंतराव कुलकर्णी, निळकंठबुवा अभ्यंकर, प्रभुदेव सरदार, यशवंतबुवा जोशी, डॉ. फळणीकर) आणि रसिक त्यांच्या मैफलींना आवर्जून उपस्थित राहत. मैफल साधारणत: रात्री साडेनऊ वाजता सुरू होई. त्यांच्या रागाचा अंदाज बांधणे

अशक्यप्राय असे. रंगमंचावर दोन तानपुऱ्यामध्ये बसल्यावर, समोरच्या रसिकांना रसिकांची नाडी ओळखून, उपस्थित असलेले खास प्रेक्षक जाणून कधी कधी अगदी प्रचलित राग बिहाग, छायानट, शुद्धकल्याण, कामोद, मारुबिहाग, परिया, परिया कल्याण नंद, तर कधीकधी अनवट राग बिहागडा, नटबिहाग, नटकेहाग, नटकेदार, शामकल्याण, बागेश्री बहार इत्यादी जोड अप्रचलित रागाने सुरुवात करीत. नंतर बरेचदा मास्तर कृष्णरावांच्या वळणाची शैलीची ठुमरी. त्यानंतर एखाद-दोन काफी, खमाज, मांड आधारित नाट्यपदे. हे सर्व साधारणपणे दोन अडीच तास झाल्यानंतर पहिले मध्यांतर होत असे. ठुमरीदेखील ते साधारणपणे अर्धा ते पाऊण तास अतिशय सुंदर गात असत. बंदीश अंगाच्या ठुमरी पद्धतीने कधीकधी ते 'देस'मधील 'पिया कर धर देखो' अप्रतिम रंगवत. मध्यंतरामध्ये रसिकांप्रमाणेच तेखील भजी, वडे असे सर्व पोटभर खात असत. ते गमतीने म्हणत, 'हे तेलयुक्त पदार्थ माझ्या गळ्याला उत्तम वंगण देतात. त्यानंतर कधी कानड्याचे प्रकार आणि रसिकांना वारंवार त्यांच्याकडून ऐकावेसे वाटणारे जोड राग वसंतबहार, बसंत केदार, हिंडोलबहार, संपूर्ण मालकंस, पंचम मालकंस, देवसाग, अभोगी असे मध्यम प्रधान राग गात. त्यानंतर उत्तरांग प्रधान राग मोहनी, अडाणा, परज, परजकलिंगडा इत्यादींच्या एक-दोन बंदिशी गात असत. मध्य लय रूपक, झपताल तालावर त्यांचे खूप प्रेम आणि प्रचंड हुकूमत होती. त्यानंतर एखादे नाट्यपद, भजन वगैरे गाऊन दुसरे मध्यांतर होत असे. त्यानंतर रसिकांच्या फर्माइशीनुसार एक-दोन राग, बंदिशी, काही नाट्यपदे; त्यात स्वत: संगीतबद्ध केलेले 'जय शंकरा गंगाधरा', 'निराकार ओमकार सुरगंगा मंगला', 'हरी मेरो जीवनप्राण आधार', 'परब्रह्म निष्काम निश्वाचे हे आमुचे' आणि सरते शेवटी भैरवी हवीच. एव्हाना रसिक स्वरगंगेमध्ये अगदी चिंब चिंब भिजून जायचे. येथे थोडा चहा घेत आणि मग तीन-चार भैरवी. भैरवीमधील वेगवेगळ्या बंदिशींचा संग्रह रामभाऊंकडे होता. कधी 'देखो मोरी चुडिया', तर कधी 'आयो फागुन मास', 'कान कुंवर मोसे' अशा अनेक बंदिशीसदृश आणि काही भैरवीतील नाट्यगीते इत्यादी झाल्यावर, स्वातंत्र्यवीर सावरकर भक्त असलेले गुरुवर्य शेवटी संपूर्ण 'वंदे मातरम्' (मास्तर कृष्णराव यांनी संगीतबद्ध केलेले) उभे राहून म्हणत असत. एव्हाना सकाळचे साडेचार-पाच वाजलेले असायचे. रामभाऊ सोडून इतर सर्व जण दमलेले असत. हार्मोनियम साथीला बऱ्याचदा गोविंदराव पटवर्धन असत. तुलसीदास बोरकर, विश्वनाथ पेंढारकर, विश्वनाथ कान्हेरे, संजय मराठे हेदेखील उत्तम साथ करीत. रामभाऊंनी उभ्या आयुष्यात किमान ७५ तबलजींचा घाम काढला आहे. रामभाऊंचे गाणे म्हटले, की अनेक तबलजी मध्यंतरानंतर दुसरा झब्बा घालत असत. कारण पहिला झब्बा घामाने थबथबलेला असे.

रामभाऊंचे वैशिष्ट्य असे, की ग्वाल्हेर गायकीचे दर्शन किंवा 'झाले युवती मना' मध्ये मास्टर दीनानाथांची आक्रमक गायकी झाल्यानंतर लगेच 'परब्रह्म निष्काम', 'अगा वैकुंठीचा राया' अशा मास्तर कृष्णारावांच्या बालगंधर्वांच्या गायकीचे लडिवाळ दर्शन होत असे. हा जो आवाजाचा, गायकीचा बदल ते करीत; तो त्या त्या गायकीमध्ये त्यांनी केलेला परकाया प्रवेश असे. तो विलक्षण अनुभव रसिकांना अचंबित करीत असे. श्रोत्यांना खूश करण्याची मनापासून इच्छा, श्रोते बघून कार्यक्रमाची मांडणी करण्याची अनुभवसिद्ध हातोटी असल्यामुळे, त्यांच्या कार्यक्रमाचा स्तर वाढत वाढत जाऊन, अत्यंत उंचीवर उत्कर्ष बिंदू गाठत असे.

प्रचंड रियाज, साधना, तालीम, निरीक्षण, चिंतन यामुळे रामभाऊ रागानुसार मांडणी बदलत असत. प्रत्येक राग एकाच पद्धतीने गायचा, असा त्यांचा प्रकार नव्हता. सादरीकरण करताना, एखादा कलाकार त्यांच्या आठवणीत आला, तर फारच वेगळे गाणे ऐकायला मिळत असे. ख्याल गायनाची सर्वच अंगे त्यांनी अत्यंत विचारपूर्वक विकसित केली होती. आलाप, बोलपट, बोलतान, तान, लयकारी सर्वच विविधतेने परिपूर्ण! त्यांच्या गायनाचा स्वभाव आक्रमकतेकडे झुकलेला होता. तो त्यांच्या शांत, संयमी प्रकृतीच्या विरुद्ध होता.

रामभाऊंकडे रागाचा आणि बंदिशींचा प्रचंड खजिना होता. एक प्रकारे त्यांना 'कोठीवाले गवय्या' असे म्हणत, ते अत्यंत सार्थ होते. त्यांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे, जोड राग, जोड रागाचे बादशहा म्हणावे, इतके विविध प्रचलित, अप्रचलित जोड राग रामभाऊ मैफलीत सहज उकल करून सादर करीत. एखाद्या स्वराला केवळ वेगळ्या रागातील स्वराचा कण देऊनदेखील त्या रागाची छाया निर्माण करून, परत फिरून मूळ रागाचे दर्शन देण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. दिल्ली, पाटणा, जालंदर, बडोदा, बनारस, लखनऊ अशा अनेक ठिकाणी आणि महाराष्ट्रात सर्वच महत्त्वाच्या संमेलनांत अनेकदा ते गायले आहेत आणि आपल्या गायकीची चिरंतन छाप ठेवली आहे. २५ नाटकांचे ७५०० प्रयोग, सुमारे ३५०० मैफली आणि १००-१२५ राग ते गात असत.

असा समर्थ, चतुरस्र, शुद्ध गायकीचा घरंदाज गायक, अत्यंत प्रेमळ, सहृदय, माणुसकी, गुरुनिष्ठा जपणारा गुरू लाभला, हे माझे भाग्य मानतो. माझा संगीताबद्दलचा सर्वंकष दृष्टिकोन त्यांनी घडवला. मनामध्ये एक खंत आहे की, संगीताचे खरोखरच भूषण असलेल्या रामभाऊंना सरकार दरबारी आणि उच्चभ्रू संगीत जगतात त्या प्रमाणात मान्यता मिळाली नाही. 'संगीत नाटक

अकादमी'चा घरंदाज शास्त्रीय संगीत गायक पुरस्कार न देता, त्यांची नाट्यसंगीत गायक म्हणून पुरस्कार देऊन बोळवण केली गेली. त्यांच्या या जन्मशताब्दीत केंद्र सरकारने आणि संगीत क्षेत्राने योग्य दखल घेऊन त्यांना मरणोत्तर उच्च पुरस्कार दिला पाहिजे, असे मनापासून वाटते. अर्थात गुरुवर्यांना याचे कसलेही दु:ख नव्हते, खंत नव्हती, कुणाबद्दल राग-द्वेषही नव्हता; कारण ते फक्त आणि फक्त गाण्यामध्येच रममाण होते.

आता त्यांच्या गायनाचे खूप ध्वनिमुद्रण उपलब्ध झाले आहे. सध्याची हुशार, चिकित्सक पिढी त्यांच्या अलौकिक गाण्याने खूपच प्रभावित झाली आहे. त्यांची गायकी, त्याचे मर्म आत्मसात करण्याचा प्रयत्न करीत आहे, त्यांच्या गायकीवर संशोधन करीत आहे, गुरुवर्य रामभाऊंनी केलेल्या भीमपलास रागातील बंदिशीमध्ये, त्यांच्या गायन परंपरेचे सार्थ वर्णन आणि गुरुजनांचे स्मरण केले आहे.

भास्कर की ये रीतभात।
भास्कर की ये रीतभात।
कृष्णदास रंग बरसे।
गुनिदास आशिषसे।
सुरगंगा बेहलाये।
तपत जपत गुरुनाम।।

***(लेखक ज्येष्ठ गायक आणि पं. राम मराठे यांचे शिष्य आहेत.)***

❖

---

आरोग्यं धन संपदा

# त्वचेची काळजी घेताना...

**ह**ल्लीच्या दूषित हवेत वावरताना त्वचेची काळजी घेणं गरजेचं आहे. त्वचेची काळजी घेणं जितकं महत्त्वाचं आहे तितकंच रात्रीसुद्धा त्याकडे लक्ष देणं गरजेचं आहे. सकाळी त्वचा तजेलदार, चमकदार दिसण्यासाठी रोज रात्री चेहरा स्वच्छ केला पाहिजे. रोज रात्री न चुकता चेहरा योग्य पद्धतीनं स्वच्छ करणं महत्त्वाचं आहे. रात्री झोपण्यापूर्वी चेहरा कसा स्वच्छ करायचा याच्या काही सोप्या टीप्स...

- रात्री कितीही उशिर झाला तरी मेकअप पूर्ण काढूनच झोपा. मेकअप रिमूव्हरने पूर्ण मेकअप काढा. गार पाण्याने चेहरा धुवा. नाइट क्रीम किंवा सीरम लावा आणि मगच झोपा.
- चेहरा स्वच्छ धुतल्यानंतर तुम्ही निवडलेले cleanser घ्या. गोलाकार पद्धतीने हळूवार चेहऱ्यावर मसाज करा. जिथे धूळ तेल आणि मेकअप जमा होतो अशा ठिकाणी म्हणजे कपाळ, हनुवटी, नाक त्या भागावर जास्त लक्ष द्या.
- कमीत कमी २० सेकंद मसाज करा. जोर लावून स्क्रब करणे टाळा.
- नखे स्वच्छ धुवा. यातून बॅक्टेरिअल इन्फेक्शन होऊ शकते. क्लींझर लावून झाल्यानंतर हात आणि नखे पूर्णपणे कोमट पाण्याने धुवा.
- मॉइश्चरायझरचा वापर करा. मॉइश्चरायझरचा वापर हा सगळ्यात महत्त्वाचा टप्पा आहे. मॉइश्चरायझर त्वचेची आर्द्रता राखून ठेवते. तज्ज्ञांच्या मते, जेव्हाही आपण झोपतो तेव्हा आपल्या त्वचेतून आर्द्रता कमी होऊ लागते, त्या डोळ्यांना आयक्रीम लावून झोपणे गरजेचे आहे. हलकी आणि डोळ्यांना आराम देणारी आयक्रीम निवडा.
- त्वचेच्या प्रकारानुसार स्कीन केअर रूटीन ठरवा. काहींची त्वचा ऑइली असते, तर काहींची कोरडी. त्यानुसार डॉक्टरांचा सल्ला घेऊन स्कीन केअर रूटीन ठरवा. कोणतेही प्रॉडक्ट वापरताना आपल्या त्वचेला ते सूट होते, की नाही हे पाहा. स्कीन स्पेशॅलिस्टचा सल्ला घ्या.
- त्वचेला तकाकी यावी असे वाटत असल्यास तिला आतूनही पोषण मिळायला हवे. बदाम, आवळा, अक्रोड याचा आहारात वापर वाढवा. तज्ज्ञांच्या सल्ल्याने ''कोलाजिन'चा डाएटमध्ये वापर करा. पुरेशी झोप घ्या. डोळ्यांच्या खाली मसाज करा. त्यासाठी व्हिटॅमिन-ई ऑइल किंवा बदाम तेल वापरा. उन्हात सनस्क्रीन जरूर वापरा. उन्हात तुमचे फिरणे जास्त असल्यास चेहरा दोनदा स्वच्छ धुवून दोनदा सनस्क्रीन लावा.



*वाढते प्रदूषण, बदलते ऋतू, शरीरातील बदल, हार्मोन्सच असंतुलन, योग्य आहाराची कमतरता याचा परिणाम त्वचेवरही होतो. त्वचेचा पोत कायम चांगला राहावा यासाठी दिवसाप्रमाणेच रात्री झोपण्यापूर्वी त्वचेची योग्य काळजी घ्यावी.*

❖

# अनंत अमुची ध्येयासक्ती

◆शब्दांकन : सौ. सीमा शशांक मराठे (पृ. ३९६) भ्रमणध्वनी: ९६८९९०२३६७

**सारे कळत नकळत घडते... हे तुम्ही आम्ही सर्वजण जाणतो. कधी कधी आपण ठरवलेल्या गोष्टीसाठी आपली धडपड सुरू असते तर कधी कधी आयुष्यात वेगळ्या संधी येतात आणि आपल्या आयुष्याला, स्वत्वाला वेगळं वळण देतात. मी हे होणार असं न ठरवताही ती वेळ, संधी, त्यासाठी घेतलेली मेहनत त्यातून निर्माण झालेली त्या कामाप्रतीची आवड तुम्हाला ध्येयवेडी व्यक्ती बनवून टाकते. आयुष्यात नक्की काय करायचं हे माहीत नसताना केवळ समाज उपयोगी काम करेन तेही वेळ मिळेल तसा... असं म्हणता म्हणता विद्याताई विशेष मुलांसाठी काम करू लागल्या. सुरुवातीला अनेक अडचणी आल्या पण न डगमगता या मुलांसाठी आपण काहीतरी केलं पाहिजे त्यासाठी त्यांनी घेतलेला ध्यास आणि त्यांची कामाप्रतीची तळमळ बघितल्यावर आपण त्यांच्यासमोर फिके पडतो असं वाटतं.**

विद्या भागवत ह्या ‘पिझम’ फाउंडेशनमध्ये सुरुवातीला व्हॉलेंटियर म्हणून कार्यरत होत्या. नंतर लार्कच्या मुख्याध्यापिका झाल्या. परिस्थितीप्रमाणे व संस्थेची गरज म्हणून इतर पदभार सांभाळत तीस वर्षानंतर गेल्या तीन वर्षापासून आज बेज्यू प्रशिक्षण केंद्राच्या मुख्याध्यापिका म्हणून त्या कार्यरत आहेत. ‘प्रिझम’ फाउंडेशन ही ‘विशेष मुलां’साठी काम करणारी संस्था आहे. यामध्ये कमतरता असलेल्या ‘विशेष’ मुलांना शिक्षण देऊन त्यांना त्यांच्या आवडी आणि कुवतीनुसार त्या त्या कामांत गुंतवले जाते. विद्याताईंशी गप्पा मारताना त्यांना विचारलं की, तुमची आणि ‘प्रिझम’ फाउंडेशनची एकमेकांशी गाठ कशी काय पडली? त्यावर विद्याताई बोलू लागल्या –

खरं तर शिक्षण घेतेवेळी त्या काळात निश्चित असं काहीच ध्येय मी ठेवलं नव्हतं. फक्त समाजोपयोगी काम करायचं हा संस्कार माझ्यावर लहानपणापासून झाला होता. सर्वसामान्य मुलींप्रमाणे लग्नाच्या वयात माझं लग्न झालं. मात्र लग्नानंतरही मी नोकरी करावी असं काही कोणाचं म्हणणं नव्हतं. एकत्र कुटुंब, मुलगा लहान त्यामुळे घरसंसार सांभाळून जे करता येत होतं ते मी करत गेले. नाटकाचं मला प्रचंड वेड होतं, फावल्या वेळेत नाटकातही मी काम करत होते. सुदैवाने माहेरी आणि सासरी दोन्ही ठिकाणी माझी ही आवड जपली गेली होती. पण तेव्हा व्यावसायिक नाटकाची ऑफर येऊनही मी ते क्षेत्र निवडलं नाही. कारण, तेव्हा माझी प्रायोरिटी ही माझं कुटुंब आणि माझ्या लहान मुलाचं संगोपन हीच होती. पण जेव्हा मुलगा पाच वर्षांचा झाला तेव्हा मात्र मला स्वस्थ बसवेना. इथूनच मी कॉलेजला घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग केला पाहिजे असं मी ठरवलं.

फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिकत असताना माझा विषय सायकॉलॉजी-सोशिओलॉजी असा होता. या माध्यमातून फिल्ड व्हिजिट देताना मेंटल हॉस्पिटलमध्ये भेट देण्याचाही योग आला. त्यावेळी कुठेतरी नकळत वाटून गेलं होतं की या फिल्डमध्ये आपल्याला काम करायला आवडेल. दरम्यानच्या काळात कामायानी इन्स्टिट्यूटचा ‘इक्विव्हॅलंट बी. एड.’ असा एक वर्षाचा कोर्स होता. त्यासाठी सिंधुताई जोशी यांना भेटले आणि ट्रेनिंग कोर्ससाठी माझं सिलेक्शन झालं. ज्या क्षेत्राची आपण निवड केली आहे त्याचं सखोल ज्ञान घेणं आवश्यक आहे या जाणिवेतून ॲडमिशन घेतली खरी; पण असं लक्षात आलं की कॉलेजमध्ये सायकॉलॉजी



शिकत असतानासुद्धा मतिमंदत्वाबद्दल आपल्याला फारशी माहिती मिळालेली नव्हती. मतिमंद मुलांना कसं शिकवायचं, त्यासाठी नेमकं काय शिकायला हवं त्यासाठी काय काय कष्ट असतात याचाही एक अंदाज या कोर्स दरम्यान आला. त्या कोर्समध्ये ब्रेन एनाटॉमी, चाईल्ड सायकॉलॉजीपासून चाईल्ड डेव्हलपमेंटपर्यंत नानाविध विषय होते. त्यावेळी या संदर्भातील मराठीमध्ये पुस्तकंही उपलब्ध नव्हती. गुगलबाबा आणि इंटरनेट वगैरेही काही नव्हतं. त्यामुळे खूप कष्ट करून ही माहिती मिळवावी लागे. बी.एड. सारखंच तयारी करून वर्गावर जाणं, निरीक्षण करणं, नोट्स काढणं अशी खूप कामं असायची. शिक्षिकाही बऱ्यापैकी कडक होत्या. सुरुवातीला थोडंसं विशेष मुलांना शिकवायला जाणं म्हणजे लष्कराच्या भाकऱ्या भाजण्यासारखं आहे असंही घरातल्यांचं म्हणणं होतं, परंतु माझा निश्चय आणि त्यासाठीची धडपड पाहून त्यांनीही पाठिंबा दिला. कोर्स पूर्ण झाल्यानंतर व्हॉलेंटियर म्हणून कामाच्या शोधात असताना नुकत्याच सुरू झालेल्या 'प्रिझम फाउंडेशन'च्या 'फिनिक्स' शाळेची माहिती कळली. त्यावेळी या शाळेत 'लर्निंग डिसॲबिलिटी'ची तीस मुलं शिकत होती. माझा इंटरव्ह्यू झाला व मी या शाळेत आले. एका शिक्षकांसोबत सहाय्यक शिक्षक म्हणून माझं काम सुरू झालं. माझी कामाप्रतीची निष्ठा, कौशल्य आणि ज्ञान या सर्व गोष्टी ज्येष्ठानी पाहिल्या आणि त्या पुढच्या वर्षापासून मी प्रिझमच्याच 'लार्क' या शाळेची जबाबदारी सांभाळायला सुरुवात केली. हळूहळू माझ्या स्वत:च्या कल्पना मुलांसाठी मी राबवू लागले. जे शिकले होते, ते खऱ्या अर्थाने तिथे प्रत्यक्षात आणता येऊ लागलं. व्यक्ती स्वातंत्र्यही असल्याने माझ्या कल्पनांना तिथे वाव मिळू लागला. इथूनच माझ्या 'प्रिझम'मधील करियरला, प्रवासाला सुरुवात झाली.

विशेष मूल जन्माला येणं हे काही आपल्या हातात नाहीये, पण तरीसुद्धा समाजाचा या मुलांकडे, या कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टिकोन काहीसा हा वेगळाच असतो. बऱ्याचदा त्यात सहानुभूती असते. सतत त्यांच्याबाबतीत अशी सहानुभूती दाखवल्यामुळे किंवा त्यांच्या कमतरतेबद्दल बोलल्यामुळे या विशेष मुलांमध्ये असलेले टॅलेंट दडपून जातं. या विशेष मुलांमध्ये वावरताना, त्यांना समजून घेताना, त्यांची जगण्यासाठीची धडपड बघताना आणि विशेष म्हणजे त्यांच्यात असलेलं वेगळेपण मला नेहमीच थक्क करतं. आज ३३ वर्षांनंतर मागे वळून पाहताना मी या 'प्रिझम' फाउंडेशनमध्ये कधी आले आणि कधी या मुलांची झाले हे माझं मलाच कळलं नाही.

कोणतंच शिक्षण कधीच वाया जात नाही ह्याची प्रचिती विद्याताईंशी बोलताना येत होती परंतु 'प्रिझम' फाउंडेशनमध्ये कशाप्रकारे या विशेष मुलांना शिक्षण दिलं जातं, कोणते उपक्रम राबवले जातात याबद्दल त्यांना विचारलं –

आमच्या संस्थेच्या शाळांचं वेगळेपण म्हणजे – इथे सर्व मुलांच्या क्षमता ओळखून त्या विकसित करण्याचा मनापासून प्रयत्न केला जातो. 'फिनिक्स'मधील विद्यार्थ्यांची त्यांच्या क्षमतेनुसार दहावीची तयारी ही करून घेतली जाते, त्यांच्यामधील सर्जनशीलता प्राधान्याने जपली जाते. त्यांच्यासाठी सर्व सण, समारंभ शाळेत साजरे केले जातात. विविध स्पर्धा घेतल्या जातात. इतर सामान्य शाळांप्रमाणे आमच्याही शाळेत गॅदरिंग होते. तेव्हा ठरवून मुद्दाम काही विषय दिले जातात. उदा. एखाद्या वस्तूचा प्रवास–मग तो वाहनाचा असो वा वस्त्राचा. मग त्यातून वेषभूषा, छोटेसे स्कीट बसवले जाते. नॉर्मल शाळांच्या स्पर्धांमध्येही सहभागी होण्यासाठी आम्ही आमच्या या मुलांची तयारी करून घेतो.

बऱ्याचदा पालक आपली पाल्यं ही घरी आपली कामं व्यवस्थित करतात असं सांगतात. पण जेव्हा या मुलांची निवासी सहल आम्ही नेतो तेव्हा कोणत्या मुलावर कुठल्या बाबतीत विशेष प्रयत्न करावे लागणार आहेत हे आमच्या लक्षात येतं आणि मग त्या दृष्टीने आम्ही त्यांच्या उपक्रमांचं नियोजन करतो.

वयात येणाऱ्या मुलांना हाताळणं खूप आव्हानात्मक असतं. कारण त्यांच्यात निर्माण होणाऱ्या हार्मोन्समुळे त्यांच्यातील ऊर्जेला सकारात्मक दिशा देण्यासाठी छोट्या छोट्या सहली, वेगवेगळे खेळ, माती काम, कोलाज काम, चित्रकला यासारखे उपक्रम सहाय्यभूत ठरतात.

आम्ही ही संस्था जवळून बघितल्यामुळे विद्याताई जे सांगत होत्या ते ऐकताना त्यांचे आणि त्यांच्यासोबत काम करणाऱ्या अनेक शिक्षकांचे कष्ट आणि चिकाटी ही वाखाणण्याजोगी आहे. पण विशेष मूल ओळखायलाही कधी कधी वेळ लागतो. तुमच्याकडे पालक अशा मुलांना योग्यवेळी घेऊन येतात का?

यावर विद्याताई म्हणाल्या की, पंचेंद्रियांमार्फत सृष्टीला जाणण्याची क्षमता आपल्याला मिळाली आहे. त्याचाच उपयोग करून आपण आपली समज वाढवतो. आजूबाजूला दिसणाऱ्या, ऐकू येणाऱ्या, स्पर्शाने, वासाने, चवीने गोष्टी जाणून त्याची बारकाईने नोंद घेत त्याचा अर्थ लावत असतो. त्यावरून साद प्रतिसाद आपल्याकडून दिला जातो. पण 'तारे जमीन पर' मधील

ईशानप्रमाणे अशा अनेक मुलांच्या या पंचेंद्रियांचे काम योग्य होत नाहीये हे वेळच्या वेळी लक्षात आलं तर त्यावर उपचार पद्धती आहे, हे आपण समजून घेतलं पाहिजे. परंतु बऱ्याच वेळा पालकांकडून ही सजगता दिसून येत नाही. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यात वेळ वाया जातो. असं मूल जन्माला आल्यावर आपलं मूल जरी वेगळं असलं तरी ते काही बाबतीत वेगळं असणार आहे, त्याच्याही बाकी गरजा इतर सर्वसामान्य मुलांच्या गरजांप्रमाणे असणार आहेत हे समजून घेऊन त्याबाबतीत पालकांनी प्रगल्भता दाखवली पाहिजे. कारण म्हणतात ना, मंजिल उन्हिको मिलती है, जिनके सपनो में जान होती है। पंखोसे कुछ नही होता, हौसलों से उडान होती है। या मुलांना ह्याच आधाराची, प्रेमाने त्यांना समजून विश्वास देण्याची गरज असते. तेच आम्ही करतो.

पद्माताईंनी दिलेल्या प्रोत्साहनाने विद्याताइनी आर्टस् बेस्ड थेरपीचा कोर्स केला. त्यावेळी केलेल्या संशोधनाअंती कलोपचाराचा या मुलांसाठी खूप चांगला उपयोग होतो असं विद्याताईंनी अनुभवलं, त्यासाठी प्रिझम फाउंडेशन अंतर्गत पाचवे केंद्र 'सृजनरंग कला अभिव्यक्ती केंद्र' या नावाने त्यांनी चालवले. तिन्ही शाळांतील सर्व विद्यार्थी येथे आठवड्यातून एकदा येऊन डान्स, ड्रम, मूव्हमेंट, ड्रामा या सगळ्यांचा मनमुराद आनंद घेत, त्यामुळे त्यांच्यातील कौशल्य विकसित व्हायला मदत होते असेही त्यांनी बोलताना नमूद केले.

तुमच्या या ध्येयवेड्या प्रवासाबद्दल आम्हांला समजलं पण 'प्रिझम' फाउंडेशनच्या उभारणीमागे ध्येयवेडी मंडळी नक्कीच असतील तर त्याविषयीही थोडं सांगा ना.

आमच्या या संस्थेच्या संस्थापक-विश्वस्त-अध्यक्ष पद्मजा गोडबोले, माधवी ओगले, यशवंतराव पटवर्धन आणि त्यांचे कुटुंबीय यांच्या पुढाकाराने १९९० मध्ये या संस्थेला सुरुवात झाली. त्यावेळी 'अध्ययन अक्षमता' या छुप्या अपंगत्वाबद्दल फारशी कोणालाच माहिती नव्हती, अशा मुलांसाठी 'फिनिक्स' या शाळेची सुरुवात झाली. अध्ययन अक्षमता असणारी मुलं ही सर्वसाधारण बुद्धिमत्ता असली, तरी त्यांना लेखन, वाचन, गणित, दिशा समजणे यासारख्या नानाविध अक्षमता असतात आणि त्यामुळे त्यांना वेगळ्या पद्धतीने शिकवावं लागतं. त्यांच्यासाठी 'फिनिक्स' शाळा काम करते. त्यांना मदतीचा हात देऊन उंच भरारी घेण्यासाठी प्रयत्नशील राहते.

या शाळेतील प्रवेशावेळी संस्था नवीन असल्याने इतर अपंगत्वाची मुलेही प्रवेशासाठी आली आणि त्यातूनच १९९१ साली 'लर्निंग असिस्टन्स रिसर्च सेंटर'- 'लार्क' या शाळेचा जन्म झाला. डाउन्स सिन्ड्रोम, सेरेब्रल पाल्सी, बौद्धिक अपंगत्व (ज्याला रूढ भाषेत मतिमंद म्हटले जाते) अशा सर्व मुलांना 'लार्क'मध्ये प्रवेश दिला जातो आणि त्यांना स्वावलंबन, सामाजिक, व्यावहारिक, भावनिक कौशल्यांचं शिक्षण देऊन स्वत:चं आयुष्य चांगल्या तऱ्हेने कसं घालवता येईल, हे शिकवलं जातं. सोबत व्यावहारिक कौशल्याचीही त्याला जोड दिली जाते.

अठरा वर्षे पूर्ण झालेल्या मुलांमध्ये आणखी प्रगती व्हावी, त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यास पूर्वीच्या 'प्रिझम प्री-व्होकेशनल स्कूलने' (आताची एम.ओ.व्ही.एस.) माधवी ओगलेंच्या मार्गदर्शनाखाली सुरुवात केली. कॅनिंग, बेकिंग, फाइल्स मेकिंग, शिवण यासारख्या गोष्टींचं शिक्षण देऊन त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणं आणि त्यांची शक्ती, त्यांचा वेळ सत्कारणी लावणं, त्यांच्यातील स्वाभिमान, आत्मविश्वास वाढवणं हा यामागचा मुख्य उद्देश आहे.

ह्या सगळ्या गोष्टी सुरू असताना अशा पद्धतीच्या प्रशिक्षणाची, शिक्षकांना अद्ययावत ज्ञान देण्याची गरजही जाणवायला लागली. त्यामुळे 'बेन्यू ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'ला सुरुवात झाली. त्याचबरोबर अशा मुलांच्या पालकांनाही आपल्या पाल्याची, त्याच्या गरजांची जाणीव होणं गरजेचं वाटू लागल्याने बेन्यूतर्फे पालकांसाठी कार्यशाळा घेतल्या जाऊ लागल्या. आज आपण २१ व्या शतकात असलो, तरी समाजाचा या विशेष मुलांकडे बघण्याचा दृष्टिकोन अजूनही बदललेला दिसत नाही, मनापासून अशा मुलांचा स्वीकार केलेला दिसत नाही, त्यामुळे या मुलांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलावा, यासाठी बेन्यूतर्फे समाजजागृतीसाठी प्रयत्न केले जातात. या विषयावर शॉर्ट कोर्सेसही आयोजित केले जातात.

अशा मुलांसाठी धडपडणारे, त्यांच्यासाठी आपलं जीवन खर्ची करणारे तिन्ही मुख्या संस्थापक, विश्वस्त आजच्या घडीला 'प्रिझम' सोबत नाहीत. काळाने त्यांना हिरावून घेतलं. तरीही न डगमगता जुन्या-नव्यांची सांगड घालत या संस्थेची वाटचाल सुरू आहे. संस्थापक, विश्वस्त यांनी ज्या पोटतिडकीने ही संस्था सुरू केली त्याचा सन्मान ठेवत, नव्या पिढीतील नव्या दमाच्या विश्वस्तांच्या साक्षीने आमच्या तिन्ही शाळांतील शिक्षकांसह आम्ही तीन मुख्याध्यापिका संचालिकांबरोबर, हा डोलारा सांभाळत आहोत. 'कोरोना' काळामध्ये दोन वर्ष ऑनलाईन शाळा घेत या संकटांना तोंड देऊन आता जूनपासून पुन्हा

आमची ऑनलाईन शाळा सुरू झाली आहे. संस्थेला आर्थिक हातभाराची गरज नक्कीच आहे. गेली ३२ वर्षे सरकारी मदतीविना, समाजातील दानशूर व्यक्तींच्या 'अर्थ'पूर्ण सहभागामुळे आणि सर्व शिक्षकवर्गाने केलेल्या सहकार्यामुळे संस्था उभी आहे. या संस्थेची नोंदणी धर्मादाय आयुक्तांकडे तसेच सार्वजनिक न्यास यांच्याकडे आहे. संस्थेला ISO 9001-2015 सर्टिफिकेट व CSR 00024713 सर्टिफिकेट 80G प्रमाणपत्र मिळाले आहे. संस्थेला 80G प्रमाणपत्र मिळाले असल्यामुळे देणगी ही करसवलत पात्र आहे, एकाच छताखाली अशा चार प्रकारच्या शाखा असणारी 'प्रिझम' ही एकमेव संस्था असल्याबाबत आमची धारणा आहे. विद्यार्थ्यांकडून जरी फी आकारली जात असली तरी या विशेष मुलांसाठी पालकांवर इतरही आर्थिक भर अधिक असल्याकारणाने वार्षिक फी कमी ठेवायची असे धोरण 'प्रिझम' संस्थेने स्थापनेपासूनच स्वीकारलेले आहे. परिणामी अनियमित देणग्या आणि नाममात्र फी याशिवाय या संस्थेला उत्पन्नाचे दुसरे साधन नाही. या वर्षीच्या 'किरात दिवाळी अंका'मुळे मुलाखतीच्या माध्यमातून आपणा सर्वांशी संवाद साधताना एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते. आपल्या सवडीनुसार शक्यतो वेळ ठरवून आमच्या संस्थेस (प्रिझम फाउंडेशन, ७७, एरंडवणा, प्रभात रोड, गल्ली क्र. १५, पुणे.) अवश्य भेट द्यावी. धन्यवाद!

विद्याताईंकडून या संस्थेविषयी ऐकल्यावर ध्येयवेडेपणा म्हणजे काय असतो हे जाणवलं. आपणही आपली रोजची कामं करत असतो. पण एखाद्या गोष्टीला वाहून घेणं आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता समाजकार्यासाठी एकनिष्ठ राहून काम करणं ही काही सोपी गोष्ट नाही. त्यासाठी असावा लागतो तो निग्रह आणि ध्यास... ध्यास आणि फक्त ध्यास!

❖

---

# जागतिक संगीत दिनी रंगणार नाट्य-भक्ती संध्या

**श्री. मुकुंद मराठे (पृ. ३६८)**



**जा**गतिक संगीत दिन, ज्येष्ठ नागरिक दिन आणि संगीतभूषण पं. राम मराठे यांच्या ३४ व्या पुण्यतिथीचं औचित्य साधून 'नादब्रह्म' या संस्थेच्या वतीने रविवार, १ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ४ ९.३० दरम्यान ज्येष्ठ तबलावादक पं. धनंजय पुराणिक आणि ज्येष्ठ संवादिनी आणि ऑर्गन वादक पं. मकरंद कुंडले यांचा 'स्वरमैत्र सन्मान' देऊन सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम सर्वेश वातानुकूलित सभागृह, डोंबिवली (पूर्व) येथे झाला. याप्रसंगी नाट्य-भक्ती संध्या ही विशेष संगीत मैफल आयोजित करण्यात आली होती. 'महाराष्ट्र टाइम्स' या कार्यक्रमाचा मीडिया पार्टनर असून रसिकांना विनामूल्य प्रवेश होता.

१८० वर्षांची परंपरा लाभलेल्या मराठी संगीत नाटकांच्या साठोत्तरी सादरीकरणात पं. मकरंद कुंडले आणि पं. धनंजय पुराणिक यांचं महत्त्वपूर्ण योगदान आहे. त्यांच्यापासून प्रेरणा घेऊन अनेक युवक ऑर्गन आणि तबला शिकले, शिकत आहेत. त्यातून ही कला पुढील पिढ्यांपर्यंत जाणार आहे. त्यामुळे या दोघांचा सन्मान केला. दोघांचा शाल, मानपत्र, मानचिन्ह इ. देऊन सत्कार केला. ज्येष्ठ तबलावादक पं. नाना मुळ्ये, पं. विश्वनाथ कान्हेरे, ज्येष्ठ गायिका आणि अभिनेत्री रजनी जोशी, ज्येष्ठ गायक नट अरविंद पिळगावकर, गायिका अर्चना कान्हेरे, पं. चंद्रकांत लिमये, साहित्य संघाचे सुधीर ठाकूर, पं. सुरेश बापट, अभिनेते-दिग्दर्शक विजय गोखले आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला.

या संगीत मैफिलीत ३५ हून अधिक ज्येष्ठ आणि नवोदित गायक वादक कलावंत यांची नाट्य आणि भक्तीगीतं सादर झाली. त्यात अर्चना कान्हेरे, सुरेश बापट, मुकुंद मराठे, सुवर्णा घैसास, ज्ञानेश पेंढारकर, पंडित चंद्रकांत लिमये, नयना आपटे, विनोदभूषण आलपे, नीलाक्षी पेंढारकर, राजेंद्र भावे, वर्षा भावे, श्रीरंग भावे, भानुदास देशपांडे, ओंकार प्रभूघाटे, स्वरांगी मराठे, केतकी भावे-जोशी, भाग्येश मराठे, वीणा वायकुळ, प्राजक्ता मराठे, आसावरी पुराणिक, स्वरा जोशी, भाग्यश्री कुंडले, महेश सारमंडळी, विनोद पुराणिक, अमृता दीक्षित, धवल भागवत, प्रकाश वगळ, केदार भागवत, आदित्य पानवळकर, प्राजक्ता काकतकर, ज्येष्ठ गायक नट पं. अरविंद पिळगांवकर आणि सत्कारमूर्ती मकरंद कुंडले, धनंजय पुराणिक आदींचा सहभाग होता.

❖

# ब्रह्मपुराणामधील श्री दत्तात्रेयांचे वर्णन

**(मार्गशीर्ष पौर्णिमा दि. २६ डिसेंबरला श्रीदत्तजयंती आहे, त्यानिमित्ताने हा लेख.)**

• डॉ. सौ. सुमेधा प्रभाकर मराठे (पृ.१२०) भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२

अठरा पुराणांमधील 'ब्रह्मपुराण' हे आद्यपुराण होय! या पुराणात सर्वप्रथम श्री दत्तात्रेयाचा उल्लेख आढळतो. देवांच्या आशीर्वादाने दत्तात्रेय, सोम, दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची एक कन्या अत्रिऋषींना प्राप्त झाली, असे हे पुराण म्हणते.

*'अत्तिराराधयामास ब्रह्माविष्णु महेश्वराज्।*
*तेषु तुष्टेसु सप्राह पुत्तायूमं भविष्यथ ।।२।।*
*तया चैका रुपवती कन्या मम भवेत्सुरा : ।।*
*तथा पुत्तत्वमापुस्ते ब्रह्मविष्णुमहेश्वरा:।।*
*कन्यांच जनयामास शुभा त्रेयीतिनामत:।।*
*दत्त : सोमोय दुर्वासा: पुतासस्थ महात्मन: ।।४।।*

ब्रह्मपुराणरचनाकारांच्या मनात श्री दत्त हा अत्रींचा अन्य पुत्रासारखाच एक पुत्र होता अशी कल्पना आहे.

याच ब्रह्मपुराणाच्या ११७ व्या अध्यायामध्ये 'आत्मतीर्थ' नावाचे तीर्थवर्णन येते. येथे श्री दत्ताचे जे चित्त ब्रह्मपुराणकारांनी आपल्यासमोर उभे केले आहे ते अवतारीपुरुषाचे नसून एका सामान्य साधकाचे अथवा उपासकाचे दिसून येते.

श्री दत्ताने आत्रींना ब्रह्मज्ञानाविषयी विचारले असता अत्रीनी श्रीदत्तांना 'तू गौतमी तटावर जाऊन शंकराची आराधना कर. म्हणजे शंकर प्रसन्न होऊन तुला ब्रह्मज्ञानप्राप्ती करून देतील.''

तेव्हा अत्रिऋषींच्या सांगण्यावरून दत्त गौतमी तीरावर गेले. तेथे स्नान करून, शुचिर्भूत होऊन हात जोडून त्यांनी शंकराची प्रार्थना केली. ती प्रार्थना अशी –

मोह, भय आणि दु:ख यांनी भरलेल्या संसाररूपी विहिरीत मी बुडतो आहे तेव्हा देवा यातून मला तारा. माझे रक्षण करा. अज्ञानरूपी अंधार समोर पसरला आहे, पंचेंद्रियांच्या वासनेत मी गुरफटलो आहे, अडकलो आहे. दारिद्र्याने आणि अनेक प्रकारच्या रोगांनी मी बांधून गेलो आहे. जखडलो आहे. मृत्यूरूपी भुजंगाने मला वेटोळे घातले आहे. काम-क्रोध-लोभ-मोह-मद-मत्सर हे षड्रिपु मला छळत आहेत. धर्म आणि भक्ती माहीत नसलेल्या मला हे सोमनाथा – आत्मज्ञान, मुक्ती दे! कारण तू करुणाकर आहेस. अपराध पोटात घालणारा कनवाळू, सर्व जगाचा कारुण्यनिधी आहेस. तेव्हा गौरीपते, शंकरा, सोमनाथा मला आत्मज्ञान प्राप्ती होऊ दे! या प्रार्थनेमुळे श्री शंकर दत्तावर संतुष्ट झाले, त्यांनी दत्ताला वर दिले. आत्मज्ञान आणि मुक्ती दिली.

ही कथा आत्मतीर्थ आख्यानातून ब्रह्मपुराणात आलेली दिसते. याठिकाणी संसारतापाने, दारिद्र्याने, रोगाने षड्विकारांनी पिडलेला आत्रीसुत दत्त श्री शंकराला याचना करताना दिसतो. दत्ताने केलेली ही याचना एका सामान्य माणसासारखीच आहे.

परंतु पुढे याच ब्रह्मपुराणात २१३ व्या अध्यायात आत्मज्ञान लाभलेल्या आत्रेय 'श्री दत्त' एक महान सिद्धपुरुष कसा आहे याचेही वर्णन आले आहे. या महात्म्याने वैदिक धर्माचे पुनरुत्थापन केले. यासंबंधात ब्रह्मपुराण म्हणते –

*''भुयो भूतात्मनो विष्णो: प्रादुर्भावो महात्मन:।*
*दत्तात्रेय इति ख्यात: क्षमय परयायुत: ।।१०६।।*
*तेन नष्टेषु वेदेषु प्रक्रियासु मखेषुच।*
*चातुर्वण्येच संकीर्णे धर्मे चाकलतां गते ।।१०७।।*
*अतिवर्धति चाधर्मे सत्ये नृष्टे नृते स्थिते।*
*प्रज्ञासू शीर्यमाणासु धमै चाखुळतो गते ।।१०८।।*
*संयज्ञा: सक्रिया: वैदा: प्रत्यावीता ही तेन वै।*
*चार्तुवर्ण्यमसंकीर्त कृतं तेन महात्मना ।।१०९।।*

याचा अर्थ असा –

विष्णूच्या प्रसादामुळे 'दत्तात्रय' नामक महात्मा जन्मास आला. तो क्षमाशील होता. वेद नष्ट झाले होते. यज्ञसंस्था लोक पावू लागली होती, चातुर्वर्ण्य शिथील होऊन वर्णसंकर होऊ पहात होता. धर्माची पकड सैल झाली होती. सत्य नष्ट होऊन 'अनृत' म्हणजे असत्यास प्रतिष्ठा लाभू पहात होती आणि 'अधर्म' मान्यात पावू पहात होता, हे सर्व दोष दूर करून दत्तात्रेयाने पुन: वेद, चातुवर्ण्य, धर्म, यश यांना मान्यता मिळवून देत धर्माचे कौशल्य दूर केले.

श्री दत्त हे सिद्ध महात्मे असल्यामुळे त्यांना वर देण्याचे सामर्थ्य लाभले होते. सहस्रबाहू कार्तवीर्याला त्यांनी १) सार्वभौमत्व व उत्तम प्रकारे राज्य शासन २) युद्धात सहस्र बाहूंची उत्पत्ती इ. ३) अधर्मापासून परावृत्त करण्यास सज्जनांचा समुपदेश ४) वरिष्ठ योद्ध्याच्या हातून मृत्यू हे चार वर दिले. या प्रकारे ब्रह्मपुराणात श्री दत्तात्रेयांचे वर्णन येते.

❖

# स्वरगंगेचे किमयागार

डॉ. सौ. मंजिरी देव (पृ.४२८), ठाणे भ्रमणध्वनी : ९८९२९५९८६५

कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालुक्यातले गणेशवाडी हे माझे माहेर. श्री गणेश हे आम्हा मराठे कुटुंबीयांचे आराध्य दैवत. माझे माहेरचे नाव मृणालिनी. अगदी लहानपणापासून श्री गणेशाचा जो लळा लागला तो अद्याप कायम आहे. श्रद्धा, भक्ती आणि कला साधना अशा तिन्ही प्रकारे या दैवताने मला साथ दिली. माहेरच्या घरी दीड दिवस श्री गणेशाची स्थापना व्हायची. मला कथ्थक नृत्याची आवड असल्याने जेव्हा त्याचे रीतसर प्रशिक्षण घेऊ लागले तेव्हा हा माझा लाडका देव नृत्य गणेश म्हणून तिथे मला नव्याने भेटला. माझी आई कीर्तन करायची, त्यात 'तांडव नृत्य करी गजानन' या रामदासांच्या रचनेवर ती छान नृत्य करीत असे.

सन १९६८ मध्ये लग्न होऊन मी ठाण्यात देवांच्या घरी आले. या माझ्या सासरी अनंत चतुर्दशीपर्यंत गणेशोत्सव असतो.

यंदा आमच्या घरच्या गणेशोत्सवाचे १०७ वे वर्ष आहे. दहा दिवस उत्सवानिमित्त खूप धमाल असते. दरवर्षी मान्यवर कलावंत आमच्या घरी घेऊन त्यांची कला सादर करतात. खड्यांच्या गौरी, त्याची सजावट. गणपतीला रोज नैवेद्य, उकडीचे-तळणीचे मोदक. आप्तेष्ट, नातेवाईक आणि मित्र मंडळींचा सतत राबता असल्याने दहा दिवस घरी मोठी धमाल असते. आम्ही सत्यनारायण आणि सत्यविनायक दोन्ही पूजा मांडतो.

श्री गणेश नृत्य कला मंदिर आणि पुढे गणेश कल्चरल ॲकॅडमी या दोन संस्थांच्या माध्यमातून पारंपरिक कथ्थक नृत्याचा प्रसार करीत असताना अगदी नावापासून गणेश आमच्यासोबत आहे. ठाण्यात दिवंगत आनंद दिघे यांच्या आग्रहाखातर मी अनेक वर्षे गणेश दर्शन स्पर्धेत परीक्षक म्हणून काम केले. त्यानिमित्ताने ठिकठिकाणच्या गणेशमूर्ती आणि सजावटी पाहता आल्या. गणेशरायाची अगणित रूपे साकारणाऱ्या मूर्तिकारांना यानिमित्ताने खास दाद द्यायला हवी. कारण वर्षभर अतिशय मेहनतीने ते मंगलमूर्तीचे रूप साकारतात. आमच्या प्रत्येक कार्यक्रमाची, सादरीकरणाची सुरुवात गणेश पूजनाने होते. त्या अर्थाने 'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' अशी आमची अवस्था आहे.



*विख्यात कथ्थक नृत्यांगना **डॉ. मंजिरी देव** यांनी माहेरच्या आणि सासरच्या गणेशोत्सवाच्या आठवणींना उजाळा दिला आहे. श्री गणेश नृत्यकला मंदिर या संस्थेच्या वतीने गेली ४७ वर्षे त्या ठाण्यात नृत्यकलेचे प्रशिक्षण देत आहेत. त्यांना विविध पुरस्कार प्राप्त झाले असून त्यांच्या अनेक शिष्या नृत्यकलेचा वारसा समर्थपणे पुढे नेत आहेत.*

गणपती ही जशी नृत्याची तशीच काव्य प्रतिभेचीही देवता आहे. प्रबंध संशोधन करताना मी पारंपरिक ५०० हून अधिक कवित्व शोधले. त्यातील २२ कवित्व गणपती वंदन अथवा स्तुतीपर आहेत. मीही काही कवित्व रचना केल्या आहेत. अनेक गणेशगीतांवर आधारित मी कथ्थक नृत्ये बसवली आहेत. रसिकांकडून त्याला खूप चांगली दाद मिळाली. गणेश विसर्जन सोहळा हाही वैशिष्ट्यपूर्ण असतो. मनाला हुरहूर लावणारा, परंतु पुढच्या वर्षी बाप्पा नक्की येणार हा विश्वास असतो. शून्यातून पुन्हा सृजत नेणारा हा गणेशोत्सव, परदेशी जाणारे आपले सगेसोयरे काही दिवसांनी जसे पुन्हा मायदेशी येतात, तसा हा गणपती पुन्हा आपल्या जीवनात आनंद निर्माण करण्यासाठी येतो.

❖

# कलामहर्षी बाबुराव पेंटर

## (१८९० ते १९५४)



**बा**बुराव पेंटरांचे खरे नाव बाबुराव कृष्ण मेस्त्री. ३ जून १८९० रोजी त्यांचा कोल्हापूर येथे जन्म झाला, नंतर ललित कलादर्श कंपनीचे पडदे रंगविण्यासाठी बाबुराव आपले बंधु आनंदराव यांच्या बरोबर १९१० साली मुंबईला आले. या वास्तव्यात पेंटर बंधूनी मुंबईत अनेक परदेशी मूकपट पाहिले आणि आनंदरावांनी मूकपट काढायचा ध्यास घेतला. पण कॅमेरा कोठे मिळणार? भांडवल कोण देणार? म्हणून पेंटर बंधूंनी स्वत:च कॅमेरा बनवायला घेतला. पण हे प्रयत्न यशस्वी व्हायच्या आत १९१५ साली आनंदरावांचे निधन झाले. चित्रपट निर्माण करण्याचे स्वप्न त्यांनी बाबूरावांना दिले. आनंदरावांची आठवण म्हणून बाबूरावांनी वयाच्या २४ व्या वर्षी दाढी राखली व चित्रपट निर्मितीच्या उद्योगाला ते लागले. १९१८ साली कॅमेरा बनविण्याचा त्यांचा उद्योग यशस्वी झाला. कोल्हापूरच्या नातीबाई कागलकर यांनी त्यांना भांडवल पुरवले. १ डिसेंबर १९१९ रोजी कोल्हापूरात महाराष्ट्र फिल्म कंपनीची स्थापना केली. १९२० मध्ये सैरंध्री या पहिल्याच मूकपटाने बाबूरावांचे नाव लोकप्रिय झाले. दुसरा मूकपट 'सिंहगड'! व्ही. शांताराम याचवेळी येऊन मिळाले. सावकारी पाश, राणा हमीर, शहा शह, महारथी कर्ण असे मूकपट काढले. १९१९ ते १९३० या मूकपट जमान्यांत बाबुराव चित्रपट व्यवसाय गाजविला. १९३० साली बाबुरावांनी महाराष्ट्र फिल्म कंपनी सोडली. १९३४ साली बोलपट युग सुरू झाल्यावर शालीनी सिनेटोनसाठी 'प्रतिभा', 'उषा', 'सावकारी पाश' दिग्दर्शन केल्यावर शालीनी सिनेटोन ही त्यांनी सोडली. नंतर रुक्मिणी स्वयंवर (१९४६), राम जोशी (१९४८) व विश्वामित्र (१९५२) हे बोलपट दिग्दर्शित केले. १९५४ साली त्यांचे निधन झाले.

चित्रपट दिग्दर्शक, चित्रकार, शिल्पकार, यंत्रविशारद, कलादिग्दर्शक, फोटोग्राफर अशी त्यांची बहुविध प्रतिभा होती. कोल्हापूरात चित्रपट व्यवसायाचा पाया त्यांनी घातला. नट, नटी, दिग्दर्शक, कलादिग्दर्शक संकलक, अशी असंख्य माणसे त्यांनी चित्रपट व्यवसायाला दिली. 'प्रभात'चे पाच पांडव (शांताराम, दामले फत्तेलाल, धायबर, कुलकर्णी) बाबुराव पेंटरांचे शिष्यच. बाबुरावांची कला त्यांच्या शिष्यांनी वाढविली, जोपासली, पुढे नेली. बाबुराव केवळ एक व्यक्ती न राहाता संस्थाच होते.

❖

---

**खजूर**



*खजूर दुधात मिसळून मिल्क शेक बनवा...*

**कसा होईल फायदा** : खजूर आणि दुधामध्ये उपलब्ध कॅल्शियम आणि प्रोटीन मसल्स मजबूत बनवतील. यामुळे कार्ब्समुळे पचनतंत्र चांगले राहते.

**अंजीर**

*भरडलेल्या धान्यामध्ये टाकून खावे...*



**कसा होईल फायदा** : अंजीर आणि भरडलेले धान्य (सुजी) दोन्हीमध्ये अँटीऑक्सीडेंट असते, जे वाढत्या वयाचा प्रभाव कमी करते. मेटॅबॉलिझम सुधारतो.

**बदाम**



*बदाम पाण्यात भिजवून खावेत...*

**कसा होईल फायदा** : बदामाच्या सालीमध्ये टॅनिन नावाचे ॲसिड असते. बदाम पाण्यात भिजवल्याने हे ॲसिड बदामाच्या आत जाते. हे जास्त फायदेशीर आहे.

**अक्रोड**




*अक्रोड सलाडमध्ये मिसळून खावे...*

**कसा होईल फायदा** : अक्रोड आणि सलाड दोन्हीमध्ये फायबर असते. यामुळे वजन कमी होईल आणि डायजेशन ठीक राहील.

# टूथपेस्ट

इ. सनापूर्वी तिसऱ्या-चौथ्या शतकामध्ये ग्रीक आणि रोमन लोक काही झाडांच्या फळांतून निघणारा फेस घेऊन दात घासत असत. एकंदर वर्णनावरून असे वाटते की, ही फळं म्हणजे रिठे किंवा त्या प्रकारची फळे असावीत.

ग्रीक, रोमन लोकांनी पुढे इजिप्तवर स्वारी केली. इजिप्शियन लोक दात घासण्यासाठी रॉक फॉस्फेट, काही सुवासिक फुले, मिंटसारखा वास आणि मध यांचे मिश्रण वापरत.



भारतामध्ये दात घासण्यासाठी मीठ, कडुलिंबाची काडी म्हणजे दातून याचा उपयोग करीत. शेणीपासून होणारी राखुंडी, कोळशाची पूड आणि त्यात काही औषधी द्रव्ये घालून मंजन बनवले जाई.

दक्षिण अमेरिकेत तंबाखूची पावडर करून दात घासायला वापरत. टूथपेस्टची पहिली कल्पना इ. स. १८०० च्या सुमाराला औद्योगिक क्रांतीच्या वेगामुळे अस्तित्वात आली.

१८७३ मध्ये प्रथम चिनी मातीच्या भांड्यात ग्लिसरिन, पेपरमिंट आणि काही इतर द्रव्ये घालून प्रवाही म्हणजे ओले दंतमंजन तयार करण्यात आले. ते बाजारात आले; पण ते भांड्यातून काढताना त्रास व्हायला लागला. हा प्रकार १८९३ पर्यंत चालला.

१८९३ मध्ये जॉन डायसन या माणसाने ॲल्युमिनियम फॉइलमध्ये टूथपेस्ट भरावी असा विचार मांडला. ही टूथपेस्टची पहिली सुरुवात म्हणता येईल. त्यानंतर १९०० मध्ये कोलगेट या कंपनीने अशी ॲल्युमिनियम फॉईलमधील टूथपेस्ट बाजारात आणली. १९३७ च्या सुमाराला नायलॉन व पॉलिस्टरचा शोध लागला. त्यानंतर टूथपेस्ट भरण्याकरता ॲल्युमिनियम फॉईलऐवजी नायलॉन व पॉलिस्टरचा वापर करून ट्यूब तयार केल्या तर खर्च कमी येईल अशी कल्पना पुढे आली.

**प्रेषक : श्री. प्रभाकर दामोदर मराठे (१२०)**

---

भरलेला खिसा माणसाला 'जग' दाखवतो,
आणि रिकामा खिसा याच जगातली 'माणसं' दाखवतो,
ज्याला शंभर किलो धान्याचं पोतं उचलता येतं,
त्याला ते विकत घेता येत नाही आणि ज्याला विकत घेता येत,
त्याला उचलता येत नाही. "**विचित्र आहे पण सत्य आहे.**"
आपल्याला जे जे पाहिजे, ते ते सर्व मिळाले असते तर...!!
जगायला गंमत आणि देवाला किंमत राहिली नसती...!!
चांगले मित्र आणि औषधे हि आपल्या आयुष्यातील वेदना
दूर करायचे काम करतात. फरक इतकाच कि, औषधांना
एक्सपायरी डेट असते, पण
मित्रांना नाही...



महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व
**पु.ल. देशपांडे**

## विनोद



राजू : आज माझा सामना एका वाघाशी झाला.
रामू : बापरे! खरंच?
राजू : अगदी खरं. वाघ माझ्याकडे टक लावून बघत होता. मीही त्याच्या डोळ्यांत थेट बघत होतो.
रामू : मग? पुढे काय झालं?
राजू : मग मी पुढे गेलो.
रामू : काय?
राजू : मी पुढे गेलो. कारण मला प्राणिसंग्रहालयातले इतरही प्राणी बघायचे होते ना!

---

## हसरे हितगुज

विनोद : सतीश तू उसने पैसे घेऊन या फेब्रुवारीला वर्ष होतंय. केव्हा देणारेस पैसे?
सतीश : या तीस फेब्रुवारीला नक्की देतो. काळजी करू नकोस.
विनोद : अहो शेठजी, कर्ज रकमेवर १२ महिन्यांऐवजी तुम्ही १३ महिन्यांचे व्याज कसे काय लावले?
शेठजी : अरे, यावर्षी अधिक मास होता. म्हणजे वर्षाचे १३ महिने झाले की!

# मराठी नाट्यसृष्टी

श्री. रघुवीर मराठे (पृ. ४२१), बडोदा
भ्रमणध्वनी: ९८७९१८१८३३

बऱ्याच दिवसापासून माझ्या मनांत एका पुस्तकाबद्दल एवढं प्रेम निर्माण झालं बर ते एका ओळखीच्या म्हणावं तर नुसती ओळख नव्हती तर त्यांच्या आजोबांपासून आमचा आणि त्यांचा गिऱ्हाईक म्हणून व नंतर डॉ म्हणून संबंध आला.

हे पुस्तक हाती पडल्यानंतर ते एका बैठकीत वाचून होण्यासारखं नव्हतं कारण त्याचे संदर्भ इतके जुने होते कि आपली मती गुंग होते ह्या पुस्तकाचं नाव मी सगळ्यांत शेवटी सांगेन कदाचित आपल्यातील ह्या कार्यक्षेत्रातील मंडळी ते ओळखतील सुद्धा.

आमच्या घरांत मी सोडून सगळ्यांनी नाटकांत कामे केली आहेत. आमच्या वडिलांनी कै. रामभाऊंनी बसवलेल्या नाटकांत काम केलं. बाळासाहेबांनी एका पोलीस इन्स्पेक्टरांचे काम लक्षांत राहण्यासारखे केले. आमच्या दोन्ही बहिणी तसेच आमचे कनिष्ठ बंधू श्री. मोहनराव यांनी बरोडा अँमॅच्युअर्स ड्रॅमॅटिक क्लबमध्ये बरीच पदे भूषवली होती (त्यामध्ये त्यांनी असाच रोल केला होता. त्यांत त्यांचा नटसम्राट म्हणून महाराष्ट्र टाइम्समध्ये उल्लेख आल्यामुळे बऱ्याच लोकांनी उपरोधिक सूर लावला होता.ह्यासर्वांचा परिणाम म्हणा) मी फक्त नाटकंच बघितली आणि वाचली.

हे जे पुस्तक आहे त्याला प्रस्तावना कुणाची असेल म्हणून सहज मी बघितलं तर ती कै. प्र.के. अत्रे ह्यांची! म्हणजे आपल्याला कल्पना आली असेलच आणि अभिप्राय कै. ना.सी. फडके, कै. कृ.पा. कुलकर्णी, कै. वासुदेव वामन भोळे, कै. वसंतराव कप्तान, कै. कृष्णराव मराठे ('श्रीराम प्रिंटींग'चे मालक) ह्यां सर्वांचे. ह्या लेखकाच्या पुस्तकांचे प्रस्तावना लिहिण्याचे भाग्य मिळाले.

अत्र्यानी प्रस्तावनेची सुरुवातच मुळी अशी केली आहे की त्यांच्या दोन तपांच्या अकृत्रिम मैत्रीची नोंद ह्या निमित्ताने व्हावी ह्या बुद्धीने मी हे काम स्वीकारतो. लेखक किती भाग्यवान. हे पुस्तक मी माझ्या पुण्याच्या म्हणजे श्री राम कोल्हटकर या मित्राला भेट दिले होते. त्याने ते अत्र्यांच्या मुलीकडे फोन करून विचारले की ही प्रस्तावना लिहिलेलं पुस्तक तुमच्याकडे आहे का? त्यांना हे पुस्तकंच त्यांच्या संग्रही नसल्यामुळे माहीत नव्हते. त्यांनी सांगितले की मुंबईला आलात की मला जरूर भेटा. त्यांनाही आश्चर्य वाटले. समग्र आचार्य अत्रे साहित्यातील नामावलीत ह्या पुस्तकाचं नाव नव्हतं. कारण ते पुस्तक माझ्या संग्रही आहे.

मराठी साहित्याशी निकट संबंध जे काही थोडेफार मराठी भाषेचे प्राध्यापक महाराष्ट्रात आहेत त्यांत बडोद्याच्या वि. पां. दांडेकर ह्या लेखकाचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. मराठी वाङ्मयाच्या विविध क्षेत्रांत हे लेखक वावरत असत. त्यांच्या विद्वत्तेला आणि व्यासंगाला रसिकतेची अन खेळकरपणाची जोड मिळाल्यामुळे आणि त्यांत त्यांच्या स्वभाव विशिष्ट सौजन्याची भर पडल्यामुळे त्यांच्या लेखनशैलीत एक साहजिक प्रसन्नता आणि सुबोधता आलेली होती. म्हणून त्यांचा वाङ्मयीन सहवास केव्हाही सुखावह वाटतो. एवढ्यामुळेच त्यांच्या लेखनवैशिष्ट्याने हा साडे चारशे पानांचा ग्रंथ अत्यंत आकर्षक आणि वाचनीय झालेला आहे असे अत्रे म्हणतात.उगीचच अत्रे कुणाची स्तुती करणार नाहीत.

मराठी रंगभूमी हे मराठी माणसाच्या आनंदाचे आणि अभिमानाचे एक चिरंतन निधान आहे. मराठी माणसाच्या रक्तातच मुळी नाट्य आल्यामुळे नाटक म्हटले की त्याच्या अंगावर आनंदाचे रोमांच उभे रहातात आणि त्याला बाकीच्या गोष्टींचा विसर पडतो. मराठी रंगभूमीला आज शे-सव्वाशे वर्षे झाली ह्या प्रदीर्घ काळांत ज्या ज्या संपन्न आणि विपन्नावस्थेतून तिला जावे लागले त्याचा इतिहास हेच मुळीं एक मोठे नाटक होईल. पारतंत्र्याच्या काळांत अनेक नामवंत नाटककारांनी आणि नटांनी तिला वैभवाच्या कळसावर नेवून बसवले तर स्वातंत्र्याच्या काळांत स्वकीय राज्यकर्त्यांनी तिला सिंधुप्रमाणे एका फाटक्या जुनेऱ्यानिशी घराबाहेर काढले. आजच्या काळासारखी दुर्दशा पूर्वी कधीच झाली नसेल असे असूनही तिच्या भवितव्याबद्दल कोणालाही निराश वाटण्याचे कारण नाही. तिच्या जीवन नाट्यातला हा बहुधा चौथा अंक असेल. मात्र हे नाटक अखेर आनंदपर्यवसायीच होणार ह्याबद्दल कोणालाही शंका नाही, कारण मराठी माणसांचे अंतःकरण हे तिचे शक्तीस्थान आहे. इतक्याही विपत्कालात ती तग धरून राहिलेली आहे त्याचे तरी हेच कारण आहे. नाटकाविषयी मराठी माणसाचे उपजत वेड हाच मराठी

रंगभूमीचा खरा पाया आहे.

मराठी नाटकांच्या प्रयोगाप्रमाणेच नाटकांचा आणि नटांचा इतिहास हा देखील मराठी माणसांचा आवडीचा विषय आहे. त्या संबंधी जुन्या हकिगती कितिदांही वाचल्या नि ऐकल्या तरी मनाची तृप्ति होत नाही. पुन्हा पुन्हा त्या गोष्टी ऐकाव्याशा वाटतात ह्या बाबतीत बडोदेकरांना कै रामभाऊ जोशयांचा तसेच मनुभाऊ सोहोनी यांचा चांगला अनुभव आहे. ते सांगायला लागले कि साक्षांत डोळ्यासमोर नाटकचं उभे करीत असत त्यांना माहीत असलेल्या जुन्या नट आणि नाटक बसवताना अनुभवलेल्या अडचणींचे वर्णन तर त्यांच्याच तोंडून ऐकावे. अजून पर्यंत कुणीही सांगणारा बडोद्यात त्या नंतर झालेला ऐकिवात नाही तसे बरेच जण त्यांच्या हाताखाली तयार झाले पण नाव ठेवण्याशिवाय त्यांना किंवा उखाळ्या पाखाळ्या करण्यांतच धन्यता मानतात. ज्याला आपण सांगण्याची धाटणी किंवा ओरेटरी म्हणतो ती अजिबात कुणाच्यात नाही.

मराठी नाटकांचा किंवा नाटक मंडळांचा इतिहास लिहिणाऱ्यांना हा एक मोठा फायदा आहे. त्यांना रसिक वाचकांचा कधीच तुटवडा पडणार नाही पण सांगणारी माणसे आहेत कुठे? मागे एकदा पु.लं. षण्मुखानंद हॉल मध्ये वि.वा. शिरवाडकरांच्या सत्काराच्या वेळी प्रास्ताविक सुरू करायच्या सुरुवातीला शिरवाडकरांच्या पायाला स्पर्श करून म्हणाले आता अशी वंदनीय पाऊले नमस्काराला मिळणे हेही भाग्य लागते आणि अशी पावले आहेत कुठे? संबंध प्रेक्षागार दोन मिनिटे स्तब्ध होऊन टाळ्यांच्या गडगडाटात त्यांनी भाषण केले आता अशी थोर माणसे क्वचितच लाभतात.

मराठी रंगभूमीचा सांगोपांग इतिहास लिहिण्यास प्रारंभ झाला आहे खरा पण ते काही एकट्या दुकट्याचे काम नाही. त्याला अनेक माणसांच्या अविश्रांत परिश्रमांची आणि चिकाटीची दीर्घकालीन आवश्यकता आहे. त्या दृष्टीने लेखकाने मराठी नाटकांचा इतिहास लिहिण्याला सोळा वर्षांपूर्वीच प्रारंभ करून फार मोठी आघाडी मारली आहे.

लेखकाने पौराणिक नाटकांच्या इतिहासांचा पहिला खंड त्यांनी १९४१ साली प्रसिद्ध केला त्यानंतर पांच वर्षांनी त्यांनी सामाजिक नाटकांच्या इतीहासाचा दुसरा खंड सादर केला त्यामध्ये गेल्या बारा वर्षांत घडलेल्या इतिहासाची भर घालून अद्ययावत स्वरूपांत त्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति प्रसिद्ध केली हा ग्रंथ वरवर बघून चाळणाऱ्यालाहि तो तयार करताना ग्रंथकाराला किती वर्षे अहोरात्र कष्ट करावे लागले असतील त्याची यथार्थ कल्पना येते आणि उर अक्षरशः फाटतो. कमीतकमी पाचशे नाटकांचा उल्लेख ह्या ग्रंथांत आलेला आहे हि नाटके ग्रंथकाराने नुसती चाळली नाहीत तर ती काळजीपूर्वक वाचून त्यापैकी कित्येक नाटकांचा सारांश सांगितला आहे तर कित्येकांचे तपशीलवार समीक्षण केलेले आहे. प्रत्येक नाटकांची सरासरी पृष्ठसंख्या ऐंशी धरली तरी कमीतकमी चाळीसहजार पाने त्यांनी अभ्यासिली आहेत. त्याखेरीज पाश्चात्त्य भाषणातील निरनिराळ्या नामवंत नाटककारांच्या सुप्रसिद्ध नाट्यकृतींचे ग्रंथकाराने परिशीलन केलेले आहे. नाट्यशास्त्रावरील अनेक टीकाग्रंथांच्याही अभ्यासाचा त्यांनी जागोजाग हवाला दिला आहे. सारांश हा ग्रंथ म्हणजे फार मोठ्या तपश्चर्येची सिद्धी आहे. हा विचार मनांत आणला म्हणजे मराठी रंगभूमीच्या भक्तांना ग्रंथकाराबद्दल कृतज्ञता वाटल्यावाचून राहाणार नाही.

ह्या ग्रंथाचे स्वरूप केवळ विवेचनात्मक नाही. वर्णनात्मक मजकुराने त्याचा पुष्कळसा भाग व्यापलेला आहे. सर्व नाटकांचा सांगोपांग इतिहास लिहावयाचा म्हणजे त्याची तपशीलवार नोंद करणे अपरिहार्यच आहे. ते काम लेखकाने उत्कृष्टपणे केले आहे. १८५९ ते १९०० पर्यंतच्या कालखंडातील कित्येक नाटकांची वा नाटककारांची नावे ऐकण्यापलीकडे त्यांची अधिक माहिती अत्रेसारख्या अत्रे ह्यांच्यासारख्या नाटक कारांना अथवा त्यांच्या काळातल्या लोकांना माहीत नव्हती.

तरुणीशिक्षण नाटिका, मोर एल एल बी, सौभाग्यरमा इत्यादी नाटकांचा उल्लेख जुन्या पिढीतल्या लोकांच्या तोंडून कधीमधी ऐकावयास मिळे तेवढाच, पण त्या नाटकांचा विषय आणि आशय समजण्याचा अत्र्यांना प्रत्यक्ष योग्य असा कधीच आला नाही आता इतक्या वर्षांनी लेखकाच्या ह्या ग्रंथामुळे त्या अतृप्त जिज्ञासाचे समाधान होत आहे असे ते म्हणतात. मराठी रंगभूमीच्या जन्मकाळापासून तो ह्या शतकाच्या प्रारंभापर्यंत म्हणजे ६०–६५ वर्षांचा काळांत ज्या निरनिराळ्या अवस्थेमधून मराठी नाट्यकला गेली त्याचा तपशीलवार आणि मनोरंजक इतिहास मराठी वाचकांना ह्याच ग्रंथांत प्रथम वाचावयास मिळेल. कळसूत्री बाहुल्यांचे खेळ ललितें किंवा प्राथमिक अवस्थेमधील नाटके ह्यांच्यांतील संवादाचे नमुने तर दुसऱ्या कुठल्याच ग्रंथांत वाचावयास मिळणे दुर्मिळ आहे. हे ह्या ग्रंथाचे अपूर्व वैशिष्ट्य म्हटले पाहिजे.

मराठी रंगभूमीच्या इतिहासाचे अत्रे ह्यांच्या दृष्टीने एकंदर पांच कालखंड पडतात १८४३–१८८ पहिला खंड. ह्या काळांत विष्णुदास भाव्यांनी सुरु केलेल्या उपक्रमाप्रमाणे पौराणिक आख्यानांचे प्रयोग बहुधा सर्वत्र होत असत. ह्या काळांत मराठी रंगभूमीला स्पष्ट आणि निश्चित असे स्वरूप आले नव्हते. ते कार्य

अण्णासाहेब किर्लोस्कर ह्यांनी केले १८८० ते १९०० ह्या काळांत किर्लोस्कर देवलांनी मराठी रंगभूमीचा पाया घातला.तेंव्हा त्या खंडाला त्यांचे नांव द्यायला हवे. १९००-१९२० हे खाडिलकर व कोल्हटकरांचे युग होय ह्या काळांत देशांतल्या फार मोठ्या राजकीय घडामोडी घडून आल्या त्यांचे नेतृत्व महाराष्ट्राकडे असल्याने त्याचा ठसा महाराष्ट्राच्या अंतर्बाहय जीवनावर उमटल्यावाचून राहिला नाही. टिळकांचे राष्ट्रीय राजकारण नाटकांच्या द्वारे समाजाच्या गळी उतरवण्याचे अत्यंत अवघड कार्य खाडिलकरांनी केले तर सामाजिक अन्यायाकडे सहानुभूतीच्या नजरेने पाहण्यास समाजाला कोल्हटकरांनी शिकवले. समाजाच्या विचाराला चालना देण्यासाठी ध्येयप्रधान नि सहेतुक नाटके लिहिण्याची परंपरा ह्या दोन नाटककारांनी घालून मराठी रंगमंदिराला टोलेजंग वैभव प्राप्त करून दिले ह्यांत शंका नाही. पण ह्या मंदिरावर घुमट आणि कळस चढविण्याचे कार्य १९२० ते १९३५ ह्या कालखंडांत राम गणेश गडकरी व वरेरकर ह्यांनींच केले. गडकऱ्यांच्या मृत्यूनंतरच त्यांना खरी लोकप्रियता प्राप्त झाली म्हणून त्यांचे युग १९२० सालापासून सुरू झाले असे मानले पाहिजे. १९३५ ते १९५९ ह्या काळांत बोलपटांच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे मराठी रंगभूमीला ओहोटी लागली ह्या काळांत तिला जगवण्याचे प्रयत्न अत्रे आणि रांगणेकरांनी केले. त्यानंतर पुढच्या ६-७ वर्षांत काही थोडेसे प्रतिभाशाली नाटककार उदयाला जरी आले असले आणि कित्येक हौशी आणि जुन्या नटांनी मराठी रंगभूमीला जगवण्याचा संयुक्त प्रयत्न चालविला असला तरी मराठी रंगभूमीची प्रगती त्या काळांत थांबलेली होती असे मानल्यावाचून गत्यंतर नाही.

लेखकाने ह्या ग्रंथांत सामाजिक नाटकाच्या दृष्टीने कालखंड पाडलेले आहेत. १८५९ ते १९०० ह्या युगाला ते सुधारणाविरोधी युग असे म्हणतात, १९०१ ते १९२० ह्या युगाला ते समन्वयवादी युग असे संबोधतात आणि १९२१ ते १९५९ पर्यंत नवयुग किंवा नवमतवादी युग असे त्यांनी नामकरण केले आहे. त्यांनी केलेले हे विभाग ढोबळ अर्थाने जरी खरे असले तरी महाराष्ट्रांतल्या सामाजिक आंदोलनाचे असे स्पष्ट टप्पे पाडता येणार नाहीत.किंबहुना महाराष्ट्रांत राजकीय विचार हा सामाजिक विचारापेक्षा अधिक प्रभावी असल्याने अमुक कालखंडांत अमुक सामाजिक विचारसरणीचे वर्चस्व होते असे निश्चितपणे म्हणणे कठीण आहे. खेरीज, सामाजिक वा राजकीय आंदोलनाची प्रतिबिंबे त्या त्या काळांतील वाङ्मयांत उमटलेली आढळून येतील असेही निश्चितपणे म्हणता येणार नाही. सुधारणेला विरोध करणाऱ्या नाटकांची परंपरा १८८६ सालीं ना.बा. कानिटकरांनी तरुणी शिक्षण नाटिकेंत सुरू केली तिचा पुरस्कार नेवाळकरांनी दंडधारी नाटकांत (१९०७) कृ. ह. दीक्षितांनी अंधविश्वासात (१९१२) माधवराव जोशांनी विनोद नाटकांत (१९१४) स.ना. ठोसरांनी प्रेमभासांत (१९१५) केलेला आढळेल आणि आजही सुधारणेला विरोध करणारी नाटके निर्माण होत नाहीत असे नाही, तेव्हा एकाच कालखंडांत सुधारणाविरोधी नाटके निर्माण झाली नाही असे म्हणता येणार नाही. मामा वरेरकर हे नवमतवादी





युगांतील एक प्रागतिक वृत्तीचे प्रमुख नाटककार आहेत. असे लेखकांचे म्हणणे आहे. पुष्कळांची तशी समजूत आहे पण ती भ्रामक आहे. मामांची पुष्कळ नाटके प्रचारात्मक आहेत म्हणून ती रंगभूमीवर फार काळ तग धरू शकली नाहीत आणि त्यांची जी नाटके लोकप्रिय झाली ती काही त्यांच्या पुरोगामी विचारामुळे नव्हे. सत्तेच्या गुलामांत असहकारवादी राजकारण हे मामांनी घुसडले आहे ते अत्यंत उथळ आहे, सोन्याच्या कळसांत म्हणे मामांनी मिलमालक आणि मजूर ह्यांचा प्रश्न सोडवला आहे. कसा तर मिल मालकाचा मुलगा आणि मजुराची मुलगी ह्यांचे लग्न घडवून आणून, हा काय पुरोगामी विचार कि त्याची थट्टा? हाच मुलाचा बाप मध्ये म्हणे मामांनी हुंड्याच्या चाली विरुद्ध लोकमत जागृत केले आहे कसे तर नवऱ्या मुलाने आपल्या बापाच्या तिजोरीतले पैसे चोरून मुलीच्या बापाकडे गुप्तपणे स्वाधीन केले आणि त्याची हुंड्याची अडचण भागवली असे दाखवून! सिंगापुरांतून ह्या नाटकांत तर नेताजी सुभाषचंद्र बोस हे जपान्यांचे एजंट आहेत असे विधान करून मामांनी आपल्या प्रतिगामित्वाचे अत्यंत हीन प्रदर्शन केले आहे.

सहा सात साली वंगभंगाची एवढी मोठी चळवळ ह्या देशांत झाली महाराष्ट्र तर ह्या चळवळीच्या अगदी आघाडीवर होता असे असूनही ह्या चळवळीचा ओझरता पडसाद सुद्धा मराठी वाङ्मयांत उमटलेला नाही काशिनाथ रघुनाथ मित्रानी वंग जागृती ह्या बंगाली नाटकांचे काय त्यावेळी भाषांतर केले असेल तेवढेच. पण त्याचा एकही प्रयोग मराठी रंगभूमीवर झाला नाही. १९२० साली असहकारीतेचे प्रचंड आंदोलन ह्या देशांत झाले तीस साली मिठाचा सत्याग्रह झाला. बेचाळीस साली 'चले जाव'ची चळवळ सत्तेचाळीस साली देशांची फाळणी आणि स्वातंत्र्य आले. १९५६ साली संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन घडले ह्या सर्व राजकीय आणि सामाजिक उलथापालथीचा मागमूसही मराठी नाटकांमध्ये किंवा कादंबऱ्यांमध्ये आढळणार नाही एखाद्या नाटककाराने गांधी टोपी किंवा स्टेट काँग्रेस अथवा कूळकायदा अशा मथळ्याचे एखादे नाटक लिहिले म्हणजे ते काही सामाजिक परिस्थितीचे प्रतिबिंब ठरत नाही. देवलांची शारदा आणि खाडिलकरांचा किचकवध ह्या दोन नाटकांखेरीज तत्कालीन सामाजिक वा राजकीय आंदोलनाचे यथार्थ चित्रण करणारी प्रभावी नाटके मराठी साहित्यांत अन्यांना तरी दुसरी आढळत नाही.

सामाजिक नाटकाची पहिली कसोटी म्हणजे ते वास्तववादी पाहिजे. त्यांत अद्भूतरम्यता औषधापुरती देखील असता कामा नये अशी नाटके मराठीत किती आढळतील? बाह्यत्कारी सामाजिक वाटणारी बहुतेक सर्व नाटके म्हणजे निव्वळ कादंबऱ्या आहेत. अदभूत गोष्टींचा सर्वत्र अनिरुद्ध आणि अमर्याद संचार. भाषा अद्भूत, व्यक्ती अद्भूत, आणि घटनाही अद्भूत. समाजाच्या वास्तव जीवनाचे दर्शनही दुर्मिळ. श्रीपाद कृष्ण कोल्हटकर आपल्या नाटकांत अनेक सामाजिक प्रश्न मांडले असे आपण समजतो. पण त्यांच्या नाटकांत चमत्कृतिजन्य घटनांची आणि अद्भूतरम्य योगायोगाची एवढी गर्दी झालेली आहे कि तिच्यामध्ये त्या सामाजिक प्रमेयांचा प्रेक्षकांना पत्ताही लागणार नाही. एकच प्याला नाटक वजा केले तर गडकऱ्यांची प्रेमसंन्यास आणि भावबंधन हि नाटकेसुद्धा वास्तववादाच्या कसोटीला उतरणार नाहीत. समाजातील वास्तव जीवनाचे दर्शन नाटकांत घडले म्हणजे ते नाटक वास्तववादी होत नाही.तर समाजाच्या जीवनांत प्रतिगामी आणि पुरोगामी शक्तींचा जो प्रकट आणि अप्रगट संघर्ष चाललेला असतो त्याचे प्रतिबिंब त्या वास्तव चित्रणात प्रेक्षकांना घडले पाहिजे. समाजातील प्रतिगामी वृत्ति मानवतावाद, ध्येयवाद, निसर्गवाद किंवा सौंदर्यवाद अशा नाना तऱ्हेच्या कृत्रिमवादाचे बुरखे घेऊन सामाजिक प्रगतीची वाट रोधित असतात ह्या सर्व वादाविरुद्ध बंड म्हणजे वास्तववाद. अद्भूतरम्यतेच्या खालोखाल मानवतावादाच्या आणि ध्येयवादाच्या आहारी आमची पुष्कळशी नाटके गेली असल्याने पुरोगामी वास्तववादाचे दर्शन त्यांच्यामध्ये आढळून येत नाही. हा पुरोगामी वास्तववाद म्हणजेच समाजवादी वास्तववाद तो ज्या नाटकांत प्रतिबिंबित होतो ती खरी सामाजिक नाटके. त्या कसोटीला फारच थोडी नाटके उतरतील. त्याचे कारण आमच्या पुष्कळशा नाटककारांना इब्सेन किंवा बर्नार्ड शॉ ह्याप्रमाणे आधुनिक समाजशास्त्राचे ज्ञान नसल्याने समाजातील प्रतिगामी प्रवृत्ति कोणत्या आणि पुरोगामी प्रवृत्ती कोणत्या ह्यांचे आकलन होऊ शकले नाही.

मराठीतल्या सामाजिक नाटकांचा इतिहास लिहिताना समाजवादी वास्तववादाची कसोटी लावून सर्व सामाजिक नाटकांची वर्गवारी करणे लेखकाला अर्थातच शक्य नव्हते म्हणून ज्या नाटकांत समाजाचे प्रतिबिंब उमटले असेल, ज्यांत

**कै.वसंतराव कप्तानांच्या मते**

मराठी नाट्यसृष्टीचे लेखकाने आपल्या सामाजिक नाटके ह्या ग्रंथाची दुसरी आवृत्ति काढायचे निश्चित केल्यावर त्याची मुद्रिते तपासण्याची कामगिरी त्यांनी वसंतरावांवर सोपवली व ती त्यांनी मोठ्या आनंदाने मान्य केली. पण प्रत्यक्ष काम सुरू केल्यावर ते किती किचकट आणि कंटाळवाणे आणि निरस त्याची त्यांना अनुभवाने खात्री झाली काही तरी सबब सांगून हे काम मधूनच सोडून द्यावे असा विचारही मनांत आला. पण ग्रंथातील मजकुराने इतके काही आकर्षण निर्माण केले कि स्वतःला नकळतच त्यांनी ग्रंथाची सर्व मुद्रिते तपासली. मुद्रिते तपासण्याच्या भव्य दिव्यांतून ते जे बाहेर पडले त्याचे श्रेय ते स्वतःच्या खंबीरपणाकडे न घेता लेखकाच्या निवेदनशैलीसच देतात.

एखाद्या नाटकास नांदीपासूनच जसा रंग भरतो आणि मग जसे श्रोते मंत्रमुग्ध होतात तसे प्रास्ताविक या प्रकरणापासूनच सदर ग्रंथाचा वाचक रंगून जातो. कळसूत्री बाहुल्या, लळिते, तमाशे, दशावतारी खेळ, फार्स किंवा प्रहसने पारंपारिक, ऐतिहासिक व सामाजिक नाटके अशा क्रमाने मराठी नाट्यसृष्टीचा सामान्यतः विकास झाल्याचे लेखक संशोधन करून सांगतात कळसूत्री बाहुल्यांच्या खेळापासून ते अगदी तुझे आहे तुजपाशी पर्यंतचे बरीच भलीबुरी नाटके व नाट्यप्रकार वसंतरावांनी प्रत्यक्ष पाहिलेले आहेत त्यामुळे प्रस्तुत ग्रंथाने त्यांना तरी पुनः प्रत्ययाचा बहुमोल आनंद दिला आहे. लेखकाने १२० वर्षांच्या वृद्धेची कहाणी सदर पुस्तकांत ग्रथित केली आहे ती निःसंशय उद्दोधक आणि अभिमानास्पदच आहे काळाचा परिणाम जसा कलेवरावर होतो तसांचं तो कलेवरही होत असला पाहिजे अशी समजूत उरापोटाशी बाळगून उगाचच आकांडतांडव करणारे लोक सर्वत्र आढळतातच. मागल्या गोष्टी आठवीत आणि आळवीत ''मराठी रंगभूमी मेली'' गेले ते दिवस'' असे हंबरडे फोडीत हे लोक जगत असतात.त्यांना आजचा आनंद घेता येत नाही हे त्यांचे केवढे दुर्दैव।

बालगंधर्व रंगभूमीवर नाहीत म्हणू वाईट वाटले तर छोटा गंधर्वही काही कमी रंजन करीत नाही. पूर्वीचे स्त्री पार्टि गेले आणि आता स्त्री पार्ट करू लागली त्यामुळे एक निराळीच लज्जत नाट्यकलेला आली असे म्हटले तर काय हरकत आहे?

मराठी रंगभूमीवरील आस्था, प्रेम, षोक अगर क्षोभ वाटणाऱ्या सर्व रसिकांनी हे अपार मेहनत करून लिहिलेले पुस्तक एकदा अवश्य वाचावे. त्यामुळे त्यांच्या दूषित पूर्वग्रहांची जळमटे भस्म होऊन त्यांच्या दुरितांचे तिमिर दशदिशेस जाईल. लेखकाने आपले प्रचंड परिश्रम, दीर्घ संशोधन, सखल अभ्यास चिकित्सक दृष्टि, समतोल विवेचन, शास्त्रीय चिकित्सा आणि विलक्षण चिकाटी ह्या सर्व गोष्टी आपल्या सहजसुंदर, सरळ आणि प्रासादिक भाषाशैलीच्या मनोज्ञ आवरणाखाली मोठ्या कुशलतेने आणि ऋजुतेने झाकून ठेवल्या असल्याने आपण एखादा संदर्भ ग्रंथ वाचीत आहोत असे वाटत सुद्धा नाही मराठी नाट्यसृष्टीतील सामाजिक नाटकांचा हा सर्वांगसुंदर विशाल शब्दपट पहिला की त्याच्या निर्मात्याच्या उदंड आणि भगीरथ प्रयत्नाबद्दल अचंबा वाटतो.

पैसे खर्चून नाटक पाहण्यात जशी एक और मजा असते तद्वतच पुस्तक विकत घेऊन ते आपल्या फूरसदीने आणि त्याची चव घेत मुक्तपणाने वाचणे ह्यांतही एक विशेष आनंद आहे तो घ्यावा तेंव्हाच कलावयाचा साहित्याच्या अभ्यासूंना तर हा ग्रंथ सतत हाताशी असणे अवश्य आहे.

समाजाच्या चालीरीती दाखवल्या असतील, ज्यांत समाजाच्या आशा, आकांक्षा समाजापुढील विविध प्रश्न स्पष्टपणे मांडण्यात आले असतील अशा नाटकांला सामाजिक नाटक म्हटले पाहिजे अशा कामचलाऊ आणि रूढ व्याख्येचाच त्यांना आधार घ्यावा लागला आणि ह्या व्याख्येशी सर्व सामान्यपणे कोणाचाही मतभेद असण्याचे कारण नाही. तथापि राक्षसी महत्वाकांक्षा पुण्य प्रभाव किंवा कांचनगडची मोहना अशा निव्वळ काल्पनिक किंवा अद्भूतरम्य नाटकांचाही समावेश सामाजिक नाटकांत केला पाहिजे हे लेखकाचे म्हणणे अत्र्यांना मान्य नाही. स्वतः त्यांत आहे ही शंका आल्यावाचून राहिली नाही. व तिचे निराकारण करताना त्यांनी असा युक्तिवाद केला आहे कि नाटकांत सामान्य प्रतीची पात्रे घेण्याऐवजी उच्च श्रेणीतील पात्रे घेतल्याने प्रेक्षकांच्या मनावर अधिक परिणाम होतो असे पूर्वीच्या नाटककारांना वाटत असे. म्हणून ते आपल्या नाटकांमधून राजे-राण्या आणि सरदार अशा पात्रांची योजना करीत असत. पण तेवढ्या कारणामुळे अशी नाटके असामाजिक ठरण्याचे कारण नाही. एवढेच नव्हे तर शेक्सपिअरची हॅम्लेट आणि ऑथेल्लो हि नाटकेसुद्धा सामाजिकच आहेत ती त्या त्या काळातील समाजाची चित्रे आहेत असे लेखकांचे म्हणणे आहे. एखाद्या नाटकांत राजा किंवा सरदार आला म्हणजे ते नाटक असामाजिक ठरण्याचे कारण नाही हे लेखकांचे म्हणणे अत्र्यांना मान्य आहे.

मृच्छकटिक शाकुंतल किंवा सौभद्र ह्या नाटकांचा आशय

राक्षशी महत्त्वाकांक्षा किंवा पुण्यप्रभाव ह्या नाटकांच्या मानाने पुष्कळच सामाजिक वाटतो अत्र्यांचा कटाक्ष राजा राण्यांवर नाही किंवा सरदारांवर नाही. अद्‌भूतरम्य घटनेवर आहे राक्षसी महत्त्वाकांक्षा आणि पुण्यप्रभाव ह्या नाटकांमध्ये अस्वाभाविक आणि अद्‌भूत गोष्टींची इतकी रेलचेल आहे कि कोणत्याही काळी कोणत्याही समाजांत अशा गोष्टी घडत असतील असे वाटत नाही.वेषांतर, बुरखे, खोट्या दाढ्या मुलांची अदलाबदल किंवा जिवंत मुलाच्या ऐवजी मेलेले मूल आणून ठेवणे इत्यादी गोष्टी नाटकांत आल्या की त्यामधील सामाजिकता म्हणजे वास्तवता आपोआपच नष्ट होते त्या दृष्टीने भावबंधन नाटकही समाजाच्या कसोटीला उतरणार नाही.

शेक्सपिअरच्या नाटकांत मानवी स्वभावदोषांवर अधिक भर दिला आहे. कृतीशून्य विचार, संशय किंवा सत्तालोभ ह्यामुळे मनुष्याचा कसा विध्वंस होतो हे दाखवण्यासाठी त्याने हॅम्लेट, ऑथेल्लो आणि मॅकबेथ ही शोकांत नाटके लिहिली. मनुष्य हा आपल्या सामाजिक परीस्थीतीमधून निर्माण होतो ह्या गोष्टींकडे शेक्सपिअरने दुर्लक्ष केले आहे. मनुष्य हा स्वतःच्या कर्माने किंवा गुणदोषांनी चढतो किंवा पडतो अशी त्याची विचारसरणी होती. आज असे कुणी मानत नाही. एखादा मनुष्य आपल्या बलवत्तर प्रयत्नांच्या किंवा इच्छाशक्तीच्या बळावर सामाजिक परिस्थितीवर मात करू शकेल हे जरी खरे असले तरी सर्वसामान्य माणसे ही त्यांच्या आजूबाजूच्या चाललेल्या परस्परविरोधी सामाजिक संघर्षांच्या भोवऱ्यांत असहायपणे गिरक्या घेणाऱ्या बाहुल्या आहेत असा आजचा विचार आहे. एकटा दुकटा मनुष्य सुधारून चालणार नाही संबंध समाज सुधारला पाहिजे. मनुष्याच्या अपघाताला तो स्वतः कारण नसून ज्या सामाजिक परिस्थितीमध्ये तो जन्माला आलेला आहे किंवा जगतो आहे ती परिस्थिती कारण आहे अशी आजची दृष्टी आहे. मनुष्य जुगाराच्या किंवा वेश्येच्या नादी लागून आपला नाश करून घेतो ह्या विषयावर आतापर्यंत अनेक नाटककारांनी नाटके लिहिली आहेत. पण अशा नाटकामध्ये जुगारी का होतो किंवा अमुक एक वेश्या व्यवसायात का शिरते ह्याचे विश्लेषण करण्याचा एकाही नाटककाराने प्रयत्न केलेला नाही. शेक्सपिअरसारखे नाटककार मानवी जीवनाकडे केवळ व्यक्तिनिष्ठ दृष्टीने पहात असत. सामाजिक दृष्टीने ते मानवी जीवनाचे विश्लेषण करीत नसत म्हणून त्यांची नाटके सामाजिक म्हणता येणार नाहीत. लेखकाने आपल्या ग्रंथाच्या उत्तरार्धात सामाजिक नाटकांची जी यादी दिली आहे त्यामधून ४०-४५ अद्‌भूतरम्य नाटके तरी वजा घालावी लागतील. मतभेदाचा एवढा मुद्दा सोडला तर इतिहास लेखनाच्या दृष्टीने सामाजिक नाटकांची त्यांनी केलेली वर्गवारी सर्वसामान्यपणे मान्य करायला काही हरकत दिसत नाही.

ग्रंथाच्या प्रारंभी सामाजिक नाटकाचे मूळ हे संशोधनात्मक आणि उपसंहाराचे शंभर वर्षांमध्ये प्रसिद्ध झालेल्या सामाजिक नाटकांचे समालोचन हे विवेचनात्मक अशी दोन प्रदीर्घ प्रकरणे जोडली आहेत. त्यामध्ये नाट्यशास्त्राच्या आणि कलेच्या दृष्टीने ग्रंथकारांनी अत्यंत मार्मिक आणि विद्वत्तापूर्ण चर्चा केलेली आहे. मराठी रंगभूमीची अगदी आरंभापासून तो ह्या घटकेपर्यंत म्हणजे १९५९ पर्यंत तंत्रदृष्ट्या आणि गुणदृष्ट्या कशी उत्क्रांती होत गेली ह्याचा एक चित्रपटच त्यांनी आपल्या दोन प्रकरणांत वाचकांच्या डोळ्यासमोर उभा केला आहे तंत्र आणि मंत्र ह्या दोन्ही दृष्टींनी आपल्या सामाजिक नाटककारांनी अभिनंदनीय यश मिळवले आहे आपले सामाजिक नाटक हे अधिकाधिक वास्तवतापूर्ण व जीवनाशी प्रामाणिक बनत चालले आहे. त्यांतील सामाजिक प्रश्नांची चर्चा उथळ स्वरूपाची किंवा वरपांगी न राहता व्यक्तीच्या जीवनांतून तिचा उगम होऊ लागल्याने ती अधिक जिव्हाळ्याची आणि सूक्ष्म बनली आहे. ह्या त्यांनी आपल्या सर्व समालोचनाच्या शेवटी जो निष्कर्ष काढला आहे त्याच्याशी कुणीही सहमत होईल ह्यांत शंका नाही

ग्रंथाची ३०० पाने निरनिराळ्या नाटककारांच्या नाट्यकृतींचे समीक्षण करण्यांत खर्च झालेला आहे. कित्येक नाटककारांच्या बाबतीत हे समीक्षण फारच तपशिलाने आणि बारकाईने करण्यांत आलेले आहे. कोल्हटकर. गडकरी, वरेरकर, माधवराव जोशी, रांगणेकर आणि आम्ही स्वतः ह्या सहा नाटककारांच्या नाट्यसमीक्षणाने जवळजवळ दीडशे पानें व्यापली आहेत. तो एक स्वतंत्र ग्रंथच होऊ शकेल. ह्या नाटककारांच्या नाट्यकृतींचे केवळ समीक्षण करून ग्रंथकार थांबलेले नाहीत तर त्यांच्या गुणावगुणांची चर्चा करून नाटककार म्हणून त्यांचे मूल्यमापन करण्याचा लेखकाने कसोशीने प्रयत्न केला आहे एवढ्या मोठ्या प्रदीर्घ कालखंडामधला अगदी बारीकसारीक नाटककार देखील लेखकांच्या दृष्टीपथामधुन सुटलेला नाही. ज्या नाटककाराच्या नाटकाचा रंगभूमीवर प्रयोगसुद्धा झालेला नाही किंवा झाला असल्यास एखाद दुसरा झाला असेल अशांची देखील लेखकाने न विसरता आवर्जून संभावना केली आहे सुरुवातीलाच अत्र्यांनी म्हटले आहे की लेखक हे अत्यंत सौजन्य वृत्तीचे रसिक आणि समतोल टीकाकार आहेत ह्या त्यांच्या स्वभावामुळे नात्याचे निःपक्षपाती इतिहासकार होण्याची पात्रता त्यांच्या अंगी उपजतच निर्माण झाली आहे स्तुतीचा किंवा निंदेचा अतिरेक करणे हा जो आजकालचा सर्वसामान्य टीकाकारांचा स्वभावधर्म आहे त्याचा लेखकाच्या ठिकाणी कौतुकास्पद अभाव आहे. गुणांची बूज करण्याच्या कामी ते जितके तत्पर असतात, तितकेच दोषांचा

फार गवगवा करण्याइतका ते कठोरपणा दाखवीत नाहीत. त्यामुळे सामाजिक नाटकांचा सर्व इतिहास वस्तुनिष्ठ दृष्टीने वाचकांच्या पुढे मांडण्याच्या कामी ते अत्यंत यशस्वी झाले आहेत इतिहासकारांनी कोणाचीही बाजू किंवा पक्ष न घेता जसे घडले तसे वर्णन करावे त्यावरून लोकांनी आपापली मते बनवावीत हा जो महत्त्वाचा संकेत समजला जातो तो लेखकाने अत्यंत संयमाने आणि समंजसपणे पाळलेला आहे हे कुणालाही कबूल करावे लागेल.

ग्रंथकाराची लेखनशैली अत्यंत ओघवती आणि लालित्यपूर्ण असल्याने आपण एखादी गोष्ट वा कादंबरी वाचतो आहे इतक्या विनासायसाने आणि तन्मयतेने हा प्रदीर्घ आणि प्रायः गंभीर स्वरूपाचा ग्रंथ वाचणे शक्य झालेले आहे. लेखकाचा भाषविलास वाचकांना मुग्ध करून टाकल्यावाचून रहात नाही लेखकाने गडकऱ्यांच्या भाषा सौंदर्याचे किती काव्यमय शब्दामधे वर्णन केले आहे ते पहा.

ह्या भावनात्मकतेत सौंदर्याची भर घालण्याचे सर्व श्रेय गडकऱ्यांच्या उज्वल, कल्पनायुक्त व अनुप्रासात्मक भाषाशैलीला द्यावे लागेल आपली अपूर्व आणि कल्पनारम्य भाषशैलीने गडकऱ्यांनी साऱ्या महाराष्ट्राचे लक्ष आपल्याकडे बळाने खेचून घेतले मराठी गद्य समृद्ध करण्याच्या कामी ज्याप्रमाणे विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी क्रांतिकारक प्रयत्न केले त्याचप्रमाणे आणि त्यांच्या खालोखाल राम गणेश गडकरी यांनी केले. शिवरामपंत दामले, न.चि. केळकर आणि अच्युत बळवंत कोल्हटकर यांनीही मराठी गद्य वैभवशाली बनविण्यात काहीही कसूर केलेली नाही. शिवरामपंतांचा उपरोध, नरसिंह चिंतामणांची विनोदबुद्धी व मार्मिकता आणि अच्युतरावांचा नखरेलपणा या गोष्टी मराठी गद्यांत मोलाच्या मानल्या जातील. परंतु एक गोष्ट तिघांनाही लाभली नाही ती म्हणजे शिष्य परंपरेची.

मोरोपंतांच्या काळी मोरोपंतांच्या भाषाप्रभुत्वाने लोक इतके दिपले गेले की, त्यांनी एक मोरोपंत संप्रदायच मान्य केला आणि चालू ठेवला. गडकऱ्यांच्या बाबतीत असेच झाले त्यांची भाषा शैली लोकांना एवढी आवडली की त्यांच्यामागून ती वापरणाऱ्यांची परंपराच सुरू झाली. आता या परंपरेला ओहोटी लागली आहे. अनुप्रासात्मक, तालबद्ध, भावपूर्ण, समतोल, बुद्धिनिष्ठ, शाब्दिक कोट्यांनी भरलेली आणि प्रौढ पण चित्ताकर्षक भाषाशैली निर्माण करून आपल्या वाङ्मयसृष्टीलाच नव्हे तर मराठी भाषेला गडकऱ्यांनी संपन्न बनविले. वाङ्मयक्षितिजावर प्रभावशाली नवा तारा उदयाला आला आहे असे सामान्य लोकांनाही वाटू लागले ते गडकऱ्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण भाषशैलीमुळेच होय.

थोडक्यात, महाराष्ट्राच्या रंगभमीवर गेल्या शंभर वर्षांत जी सामाजिक नाटके आली त्यांचा साद्यन्त नि सुरेख इतिहास अत्यंत मनोवेधक शैलीत सांगणारा आणि मराठी रंगभूमीवरील एका महत्त्वाच्या क्षेत्राचे अत्यन्त व्यापक आणि भव्य दर्शन मराठी भाषिकांना घडविणारा दांडेकर ह्यांचा हा मराठी साहित्यामधला एकमेव ग्रंथ आहे. मराठी नाट्यवाङ्मयांत एक मार्गदर्शक आणि संदर्भ ग्रंथ ह्या दृष्टीने तर त्याचे स्थान अढळ आहे मराठी रंगभूमीचे अभ्यासक लेखकांचे सदैव ऋणीच रहातील. ❖

# वाचकांचा पत्रव्यवहार

## हा लाठीमार अक्षम्य

अग्निशमन दलातील भरतीवेळी गोंधळ झाल्यामुळे, पोलिसांनी लाठीमार केल्याचे वाचून, तळपायाची आग मस्तकात गेली. दहिसर अग्निशमन दलाच्या भरतीत गैरनियोजन झाल्याने भरती उमेदवारांना, प्रचंड मनस्ताप झाला. मुळात या पदासाठी २७३ उमेदवारांची भरती होणार होती. परंतु या ठिकाणी मात्र सात हजार मुली आल्या कशा? एका वेळेस, ५०–१००च्या गटाने मुलींना बोलावले असते किंवा ही प्रक्रिया दोन–तीन दिवस चालली असती तर बिघडले नसते. त्यात कळस म्हणजे, १६२ सेंटीमीटर उंची असूनही, अनेक उमेदवारांना अपात्र कसे ठरवण्यात आले? साहजिकच चिडलेल्या महिला उमेदवारांनी गोंधळ घातला. पोलिसांनी त्यांच्यावर लाठीहल्ला करणे, हे कोणत्या कारवाईत बसते? आधीच नोकरी मिळत नसताना मिळेल ती खडतर नोकरी करणे, उमेदवारांना क्रमप्राप्त असते. मग त्यांच्याशी समजुतीने व संयमाने वागायला काय हरकत आहे?

**– गुरुनाथ मराठे (पृ.४०८)**, *बोरिवली*

## जरब बसायला हवी

पुण्यात तरुणीवर भरदिवसा हल्ला हे वृत्त वाचून वाईट वाटले. अशा घटनांमध्ये, कोणीही मध्ये पडत नाही. या तरुणीचे नशीब बलवत्तर म्हणून एका तरुणाने आरडा–ओरडा करून, चार लोकांना जमवल्यामुळे, तो हल्लेखोर पळून गेला व त्या तरुणीचे प्राण वाचले. समोरच्या तरुणीने, लग्नाला नकार दिला तर, तो पचविण्याची ताकद हवी. कोणत्याही तरुणीचा जीव घेण्याचा अधिकार कोणालाही, कोणत्याही कारणासाठी नाही. हा संस्कार व्हायलाच हवा. तसेच लिव्ह इन राहणाऱ्या तरुणींनी प्रेमाच्या वरवरच्या रंगास भुलू नये. तरुणांचे बोलणे, वागणे संशयास्पद वाटले तर त्वरित पोलिसांकडे तक्रार करावी. त्यामुळे अशा मवाली तरुणांना जरब बसेल.

**– गुरुनाथ मराठे (पृ.४०८)**, *बोरिवली*


# सुवर्णयोग आला जुळून

• मीना सदानंद मराठे (पृ. ४१७), खार

चेंबूर हायस्कूलच्या १९७३ बॅचचं स्नेहसंमेलन नुकतंच पार पडलं. काहीही करून सुवर्णमहोत्सवी भेटीचा सुवर्णयोग जुळवून आणायचाच, असं मनाशी ठरवलं. प्रथम सुहास केतकर आणि डॉ. श्रीनिवास शुक्ल यांना माझ्या मनातली इच्छा सांगितली. आणि काय विचारता, त्या दोघांनी मिळून माझी स्नेहसंमेलनाची कल्पना उचलून धरली. आता संमेलन करायचं म्हणजे सर्वप्रथम मुलामुलींचे पत्ते आणि संपर्क क्रमांक मिळवणं आवश्यक होतं. श्रीनिवासच्या डॉक्टरी पेशामुळे त्याच्या ओळखी आणि संपर्क कामी आले. तसंच फेसबुकवरून फोटो शोधून, नावं ओळखणं आणि संपर्क क्रमांक मिळवणं असं सुहासचं सुरू होतं. तसंच आमचं चेंबूर गावठाण म्हणजे जवळजवळ चेंबूर हायस्कूलचेच विद्यार्थी. त्यामुळे कानगोष्टीप्रमाणे या सुवर्ण महोत्सवी संमेलनाची वार्ता चेंबूरभर पसरली. मीदेखील माझ्या मित्र-मैत्रिणी, त्यांच्या मित्र-मैत्रिणी असं करत अनेक मुलींशी संपर्क साधला. पाहता-पाहता ६८ विद्यार्थ्यांकडून सहमती मिळाली.

पुढच्या सर्व नियोजनाच्या हालचाली सुरू झाल्या. आता कार्यक्रम कुठे करायचा, वर्गणी किती घ्यायची, तारीख काय ठरवायची, असे विचार सुरू झाले. यासाठी सुहास, श्रीनिवास, राजन प्रधान, गिरीश देशपांडे, सुनंदा रास्ते, पांडुरंग साळुंखे, भूषणा म्हात्रे यांची साथ लाभली. हे सर्व जण आज ज्या पदावर किंवा हुद्यावर आहेत त्याचा खूप उपयोग झाला. गिरीश देशपांडे आणि भूषणा म्हात्रे-पाठारे शाळेच्या कमिटीवर असल्यानं तुम्ही ठरवाल त्या तारखेला शाळा तुमच्या स्वागतासाठी तयार असेल, असं तिनं आश्वासन दिलं. आर्थिक व्यवहार सांभाळण्याची जबाबदारी सुहास केतकरनं घेतली. राजन प्रधानचा मित्रपरिवार मोठा असल्यानं त्याच्याकडूनही अनेकांचे संपर्क क्रमांक मिळाले. सुनंदा आणि पांडुरंगकडूनही अनेक बाबतीत सल्ले व मार्गदर्शन मिळालं. सर्व मित्र-मैत्रिणींशी संपर्क साधून त्यांना आमंत्रण देण्याचं काम मी केलं.

नेमून दिल्याप्रमाणे सर्वांनी त्यांची कामं जोमानं करण्यास सुरुवात केली. श्रीनिवासनं चेंबूर जिमखाना हे संमेलनाचं ठिकाण निश्चित केलं. राजननं सर्व मित्र परिवाराशी संपर्क साधला. श्री आणि सुहासने त्याच्या मित्रांना कळवलं. मी सर्व मैत्रिणींना सुवर्णमहोत्सवी स्नेहसंमेलनाविषयी कळवलं. बघता-बघता एकूण ६८ जण सामील झाले. प्रत्येकाला शाळेचा बिल्ला देऊन त्यावर स्वतःचं नाव देवनागरी लिपीत लिहिण्यास सांगितलं. शाळेची घंटा झाली. आम्ही शाळेच्या चौकात प्रवेश केला. प्रथम प्रार्थना म्हंटली. आमच्या दिवंगत गुरुजनांना आणि मित्र-मैत्रिणींना श्रद्धांजली वाहिली. चेंबूर हायस्कूलच्या प्रथेप्रमाणे विशिष्ट पद्धतीनं टाळ्या वाजवून शाळेचा निरोप घेतला. बाहेर पटांगणावर आल्यावर काही हौशी खेळाडूंनी १०० मीटर धावण्याची शर्यतही पूर्ण केली. तेथून थेट जिमखान्यावर पोहोचलो. सुवर्णमहोत्सवाचं औचित्य साधून अजित महाडिकने सर्वांना सोनचाफ्याची फुलं दिली. जिमखान्याचा हॉल उत्साहानं, आनंदानं भरून गेला. सर्व जण परस्परांशी गप्पा गोष्टी करण्यात दंग झाले. नंतर आभार प्रदर्शन झालं. परत निघताना पावलं जड झाली होती, कारण सुवर्णमहोत्सवासाठी जमलेली पाखरं सुवर्णस्मृती घेऊन परत निघाली होती. ❖



# मधुकर चक्रदेव यांचे निधन
## हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड



**डों**बिवलीतील विविध सामाजिक संस्थांशी निकटचे संबंध असलेले उद्योजक आणि सामाजिक कार्यकर्ते मधुकर चक्रदेव यांचे सोमवारी सकाळी ७.३० वाजता हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. चक्रदेव यांच्या निधनाने या वयातही उत्साहाने सळसळणारे, प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. चक्रदेव यांच्या पार्थिवावर डोंबिवलीतील शिवमंदिर स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शेकडो डोंबिवलीकर उपस्थित होते. मधुकर चक्रदेव यांच्या पश्चात पत्नी अंजली, मुलगा अतुल, मुलगी नीलिमा, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. चक्रदेव यांच्या निधनाचे वृत्त कळताच डोंबिवलीतील अनेक मान्यवरांनी त्यांचे अंत्यदर्शन घेत कुटुंबाचे सांत्वन केले.

डोंबिवलीतील आघाडीचे उद्योजक असलेल्या चक्रदेव यांनी शहराचा सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी मोलाची भूमिका बजावली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते असलेले चक्रदेव यांनी कोणत्याही क्षेत्रातील संपूर्ण माहिती घेऊन, आपल्या ज्ञानाचा त्या क्षेत्राला कसा फायदा करून देता येईल, या ध्येयाने झपटून काम केले. डोंबिवली नागरी सहकारी बँकेचे संस्थापक संचालक म्हणून त्यांनी जबाबदारी पेलली होती. डोंबिवलीतील सर्व संस्थांना एकत्र आणणाऱ्या नागरी अभिवादन न्याय संस्थेचे अध्यक्ष आदी भूमिकांतून विविध संस्थांबरोबर काम करताना लोकाभिमुख कामांतून त्यांनी आपली छाप पाडली होती. लायन्स क्लबचे जिल्हाध्यक्ष म्हणून काम करताना मागील ११ वर्षे तलासरीच्या ग्रामीण भागात सामूहिक विवाहसोहळे आयोजित करण्यात त्यांचा पुढाकार होता. डोंबिवली जिमखान्याचे खजिनदार असलेले चक्रदेव हे जिमखान्याचे अखेरपर्यंत आधारस्तंभ राहिले. डोंबिवलीत रविवारीच झालेल्या कार्यक्रमात पूर्ण वेळ उपस्थित होते. मराठे प्रतिष्ठानवर त्यांचा लोभ होता. 'हितगुज'ला विज्ञापने ते देत असत. 'मराठे प्रतिष्ठान'द्वारा श्री. मधुकर चक्रदेव यांना भावपूर्ण श्रद्धांजली. ❖

**"आमचा हक्काचा मार्गदर्शक आमच्यातून निघून गेला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा कार्यकर्ता म्हणून त्यांचे सर्वांशी मैत्रीपूर्ण संबंध राहिले.**

**– रवींद्र चव्हाण,** *सार्व. बांधकाम मंत्री*

**जिमखान्याच्या जडणघडणीपासून जिमखान्याचा श्वास असलेले चक्रदेव जिमखान्याची धुरा एकहाती सांभाळत होते. त्यांच्या जाण्याने जिमखाना पोरका झाला आहे. कोणत्याही संकटावर मात करण्याची त्यांची हातोटी होती.**

**– दीपक मेजारी,** *संस्थापक-संचालक, डोंबिवली जिमखाना*

**डोंबिवलीच्या सार्वजनिक जीवनाचा आधारवड आज उन्मळून पडला. पटवारी-बाजपेई-चक्रदेव या त्रयीने डोंबिवलीचे सार्वजनिक-सांस्कृतिक-शैक्षणिक जीवन सर्वार्थाने उचलून धरले. ती त्रयी आज संपली.**

**– सुधीर जोगळेकर,** *अध्यक्ष, नागरी अभिवादन न्यास*"

## सुभाषित

*महायोगपीठे तटे भीमरथ्या, वरं पुण्डरीकाय दातुं मुनीन्द्रैः।*
*समागत्य तिष्ठन्तमानन्दकन्दं, परब्रह्मलिंगं भजे पाण्डुरङ्गम्।।*

भीमा नदीच्या काठी, महायोगाचे अधिष्ठान असलेल्या पंढरपुरात, पुंडलिकाला वर देण्यासाठी व्यास-नारदांसारख्या मुनिश्रेष्ठांबरोबर येऊन राहिला आहे. त्या आनंदाचे निधान परब्रह्मस्वरूप पांडुरंगाला मी भजतो. पंढरपुरातील विठ्ठलाची समचरण आणि कमरेवर हात ठेवून ताठ उभी असलेली मूर्ती योगमूर्ती आहे. येथे माता-पित्यांची सेवा करणाऱ्या भक्त पुंडलिकाला वर द्यायला ते आले आहेत. निर्गुण निराकार ब्रह्माचे सगुण साकार रूप येथे उभे आहे. गोधूली अंगावर उडाल्यामुळे विठुराया पांडुर दिसत आहेत. अशा या आनंदाचा निधी/ठेवा असणाऱ्या पांडुरंगाला मी भजतो.

**– डॉ. रोहिणी केतकर**

## साभार पोच



किरात : दिवाळी २०२३
संपादिका : श्रीमती सीमा शशांक मराठे
प्रकाशक : श्री. मेघश्याम केशव मराठे, वेंगुर्ले
पृष्ठसंख्या : १७४
मूल्य : रुपये २००/-

## पाककृती



**अळीवाचा हलवा**

**साहित्य** : दोन वाट्या खोवलेला ओला नारळ, अर्धी वाटी अळीव, दोन मोठे चमचे तूप, एक वाटी गूळ, एक चमचा वेलची पावडर, बेदाणे, खारिक पावडर.

**कृती** : अळीव हलकेच भाजून घ्या. पंधरा मिनिटे पाण्यात भिजत ठेवा. नंतर कढईत तूप घालून त्यात खोवलेला नारळ घालून थोडे परतून घ्या. नंतर गूळ घाला आणि छान एकजीव करा. मिश्रणामध्ये अळीवाचं मिश्रण घाला. त्यावर झाकण ठेवून मंद आचेवर पाच मिनिटं ठेवा नंतर बेदाणे, खारिक पावडर, वेलची पावडर घालून एकजीव करा. अळीवाचा हलवा थंडीच्या मोसमात पौष्टिक म्हणून खावा. रूचकर लागतो.








भगवद्‌गीता समर्थपणे जगायला शिकवते. ज्ञानेश्वरी म्हणजेच भगवद्‌गीता. सूर्य प्रकाशतो, प्रकाशणे हेच त्याचे कर्म आहे. याच्या परिणामाची सूर्याला जाणीव नसते. पण त्यामुळे पृथ्वीवरचे जीवन चालते. त्याचप्रमाणे परिणामांचा विचार न करता, आपल्या स्वभावाप्रमाणे, समाजाच्या हिताचे-स्वधर्माचरणाचे कर्म प्रत्येकाने केले तर त्या माणसाचे जीवन सुखकर बनून समाजाचा उत्कर्ष होतो.

गीता म्हणजे, कर्माच्या जंजाळाला कंटाळून कर्मच टाकणारा भित्रा, फलाशेने कर्म करून, बऱ्यावाईट गतीला जाणारा अज्ञानी, गीतेच्या दृष्टीने थोर तो की जो कर्म करतो. पण कर्म फलात अडकत नाही. गीतेची थोरवी याच्यातच आहे की, ती कर्म करून कर्मबंधनातून मुक्त होण्याचा मार्ग शिकविते. गीतेत पलायनवाद नाही. गीता ही कर्मास तोंड देण्यास साधकास समर्थ करते. गीतेचे हेच वैशिष्ट्य आहे.

– **वैकुंठवासी मामासाहेब दांडेकर** (गीताजयंतीच्या निमित्ताने)


**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादिका : डॉ. सौ. सुमेधा मराठे, ८/१३, सहकार नगर, वडाळा, मुंबई – ४०० ०३१
भ्रमणध्वनी : ९८२०२३२०८२/८४३३६७४२२७ • इ-मेल : **hitguj@marathepratishthan.org**
• वेबसाईट : **www.marathepratishthan.org**